
र. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. २०८



# लोकमान्यांची विधायक कामगिरी

ठाणे.
REFBK-0003032

लेखक—वि. भा. खैरे

किंमत ४ आणे.

# लोकमान्यांची विधायक कामगिरी

प्रस्तावना लेखक—प्रो. ना. ग. नारळकर
एम्. ए. एल टी.

लेखक—विठ्ठल भा. खैरे
विद्यार्थी, बी. ए. वर्ग, न्यू पूना कॉलेज, पुणें.

REFBK-0003032
3032

१ आगष्ट १९२६.

ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालय
१ ऑगस्ट १९

# प्रस्तावना

आमचे न्यू पूना कॉलेजांत लोकमान्यांचें स्मारक एक सुरेख तैलचित्र व केवळ राजकीय विषयास वाहिलेलें असें पुस्तकालय काढून करण्यांत आलें आहे. इंग्रजी व मराठी दोन्ही विभाग मिळून आज सुमारें रु. १५०० चा पुस्तक-संग्रह आहे. हें पुस्तकालय विद्यार्थ्यांच्या विशेष आवडीचें असून चिटणीसांना पुस्तकांच्या देवघेवीचे भरपूर काम असतें. विद्यार्थ्यांचें वाचन केवळ वरवर न होतां, एखाद्या आवडीच्या विषयाचा परि मपूर्वक अभ्यास करून तो विषय सांगोपांग व साधार मांडता यावा या हेतूनें प्रतिवर्षी कॉलेजांतील लोकमान्यांचे पुण्यतिथीचे समारंभाचे दिवशीं चढा ओढीच्या निबंधाची यादी प्रसिद्ध केली जाते व सुमारें चार महिन्यांचा अवधि तयारी करितां दिला जातो. निबंधाबरोबर वाचनीय पुस्तकांची यादी व त्या बाबतींत सल्ला अध्यापक वर्गाकडून दिला जातो. उमेदवारास पुस्तकें मिळण्याच्या बाबतींत बऱ्याच सवलती दिल्या जातात. अशा तऱ्हेच्या निबंधाच्या चढाओढींत ह्या छोटेखानी पुस्तकांचे लेखक रा. खैरे यांनीं आज सतत तीन वर्षे वरच्या नंबरचें बक्षीस मिळविलें आहे व हें पुस्तक म्हणजे गेल्या वर्षाचा त्यांचा सुवर्णपदक मिळालेला निबंध.

रा. खैरे यांच्या निबंधांत उगीच व्यासपीठावरचें वक्तृत्व नसून परिश्रमपूर्वक केलेल्या वाचनाचें फल आहे. निबंधास जोडलेल्या पुस्तकांच्या यादीवरून व निबंधांत आधारभूत घेतलेल्या निवडक उताऱ्यांवरून हें सहज दृष्टोत्पत्तीस येईल. निबंध लेखकाचा मोठा गुण म्हणजे

‘ आत्मविश्वास ’ ! तो रा. खैरे यांचे निबंधांत प्रत्येक पृष्ठावर दिसून येईल. त्यानीं केलेलें प्रत्येक विधान थेट अन्तःकरणांतून आलेलें आहे.

हा निबंध छापून महाराष्ट्र–जनतेपुढें ठेवण्याचें मुख्य कारण म्हणजे निबंधाचा विषय महाराष्ट्र–जनतेला विशेष जिव्हाळ्याचा आहे. लोकमान्य अलौकिक बुद्धिमान व महान देशभक्त असे विभूतिसम पुरुष होऊन गेले हें बहुतेकांस पटतें परंतु “ कायहो ! तुमच्या टिळकांची विधायक अशी कामगिरी कोणची हो?” ह्या प्रश्नाला रोखठोक जबाब त्यांच्या अनेक एकनिष्ठ भक्तांसहि देणें प्रसंगीं कठिण जातें व त्यांची वृत्ति क्षण-भर साशंक होते. हा रोखठोक जबाब ताबडतोब व ठांसून देण्यास रा. खैरे ह्यांच्या लोकमान्यांच्या कामगिरीचा पद्धतशीर आढावा त्यांस खास समर्थ करील; व सर्वांसच लोकमान्यांच्या अनुपमेय देशसेवेची खात्री पटून त्यांचे बद्दलचा आदर द्विगुणित होईल.

महाराष्ट्र–वाचक वर्गानें रा. खैरे यांची ही कामगिरी पसंत करुन त्यानां असाच अभ्यास पुढें चालू ठेवण्यास योग्य उत्तेजन द्यावें अशी विनंति आहे.

न्यू पूना कालेज, पुणें
१-८-२६

ना. ग. नारळकर

# लो. टिळकांचा विधायक कार्यक्रम.

| कामगिरी | स्वरूप |
| --- | --- |
| १ राजकीय | (१) केसरी, मराठा–सार्वजनिक जागृति<br>(२) शिवाजी–उत्सव<br>(३) विभागणी कमिशन पुढील साक्ष<br>(४) विलायतचें डेप्यूटेशन<br>(५) हिंदी स्वराज्य संघ |
| २ धार्मिक | (१) गणेशोत्सव<br>(२) केसरींतील लेख<br>(३) अनेक व्याख्यानें |
| ३ औद्योगिक | (१) पैसा फंड<br>(२) स्वदेशी चळवळ<br>(३) स्वदेशी स्टोअर्स |
| ४ प्रांतिक | (१) प्लेग निवारणार्थ हिंदु दवाखाना<br>(२) दुष्काळ कायदा स्पष्टीकरण<br>(३) मद्यपान निषेधक चळवळ |
| ५ सरस्वती सेवा | (१) न्यू इंग्लिश स्कूल<br>(२) समर्थ विद्यालय<br>(३) ओरायन, गीतारहस्य |

# खालील पुस्तकांचे आधारें निबंध लिहिला

१. लो. बाळ गंगाधर टिळक यांचें चारित्र.

लेखकः—**न. चिं. केळकर** बी. ए. एल. एल. बी.

२. लो. टिळक यांचीं गेलीं आठ वर्षे.

लेखकः—**आ. वि. कुळकर्णी**

३. लोकमान्य टिळक.

लेखकः—**प्रि. दा. ग. पाध्ये** एम्. ए.

४. टिळक जन्म रहस्य.

लेखकः—**कृ. मो. फाटक.**

५. लोकमान्य चारित्रसुधा.

लेखकः—**न. चिं. केळकर.**

६. लो. टिळकांचे केसरींतील लेख. भाग १ व २

सं. नि. ६८
... ग्रंथ संग्रहालय
नं. ७३१८१२८
३०३२

# लोकमान्यांची विधायक कामगिरी

## पेशवाई दिवंगत झाली होती

इ. स. १८५० साल जाऊन, एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्ध्याला सुरवात झाली होती. महराष्ट्राच्या दिव्य सूर्यप्रभेवर पटल येत होतें, आलें होतें. महाराष्ट्राचें नांव पुसत चाललें होतें. पण अखेर अर्धशतकाची अर्धरात्र संपली. पहांट झाली. भाग्य त्या महराष्ट्राचें ! नशीब त्या मराठ्यांचें ! पूर्वदिशा तांबूस—अधिक तांबूस—दिसूं लागली. भगवान् सूर्यनारायण आपल्या स्वर्गीय दिव्य किरणांनीं अखिल जनांला आल्हादित करूं लागला. तो महाराष्ट्राच्या भरभराटीचा, महाराष्ट्राच्या जागृतिप्रारंभाचा द्योतक रवि होता. त्याला प्रभा अनेक. परंतु विशेष प्रकाशमान, प्रज्वलित प्रभा अशा मर्यादितच होत्या. हे अमोलिक हिरे स्वतः लकाकून दुसऱ्यांना प्रकाशित करीत होते. आपल्या तेजःपुंज किरणांनीं योग्य मार्ग—स्वमताप्रमाणें—दर्शवित होते. न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, समाज सुधारक आगरकर या मर्द मराठ्यांनीं महाराष्ट्राची मर्दुमकी, महत्त्व, महाराष्ट्राचें महाराष्ट्रीयत्व, जिवन्तपणाची जाणीव अखिल भारतवर्षाला पटविली. सार्वजनिक सभा, औद्योगिक प्रदर्शनें, स्वदेशी चळवळ, शिवाजी-उत्सव, वगैरे विविध चळवळींच्या योगानें महाराष्ट्राचा पाणीदार बाणा राजकर्त्यांच्या पण नजरेंत भरत चालला होता. न्या० रानडे-अलौकिक

२८ /१७
श्री ग्रंथ
वि. सं. ७३१८१२
३०३२

# लोकमान्यांची विधायक कामगिरी

## पेशवाई दिवंगत झाली होती

इ. स. १८५० साल जाऊन, एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्ध्याला सुरवात झाली होती. महराष्ट्राच्या दिव्य सूर्यप्रभेवर पटल येत होतें, आलें होतें. महाराष्ट्राचें नांव पुसत चाललें होतें. पण अखेर अर्धशतकाची अर्धरात्र संपली. पहांट झाली. भाग्य त्या महराष्ट्राचें ! नशीब त्या मराठ्यांचें ! पूर्वदिशा तांबूस—अधिक तांबूस—दिसूं लागली. भगवान् सूर्यनारायण आपल्या स्वर्गीय दिव्य किरणांनीं अखिल जनांला आल्हादित करूं लागला. तो महाराष्ट्राच्या भरभराटीचा, महाराष्ट्राच्या जागृतिप्रारंभाचा द्योतक रवि होता. त्याला प्रभा अनेक. परंतु विशेष प्रकाशमान, प्रज्वलित प्रभा अशा मर्यादितच होत्या. हे अमोलिक हिरे स्वत: लकाकून दुसऱ्यांना प्रकाशित करीत होते. आपल्या तेज:पुंज किरणांनीं योग्य मार्ग—स्वमताप्रमाणें—दर्शवित होते. न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, समाज सुधारक आगरकर या मर्द मराठ्यांनीं महाराष्ट्राची मर्दुमकी, महत्त्व, महाराष्ट्राचें महाराष्ट्रीयत्व, जिवन्तपणाची जाणीव अखिल भारतवर्षाला पटाविली. सार्वजनिक सभा, औद्योगिक प्रदर्शनें, स्वदेशी चळवळ, शिवाजी-उत्सव, वगैरे विविध चळवळींच्या योगानें महाराष्ट्राचा पाणीदार बाणा राजकर्त्यांच्या पण नजरेंत भरत चालला होता. न्या० रानडे-अलौकिक

त्यावेळचें वातावरणच कांहीं अपूर्व होतें. कै. प्रो. वा. ब. पटवर्धन यांनीं या काळाचें अत्यंत मार्मिक व फार बहारीचें असें वर्णन केलें आहे. " प. वा. विष्णुशास्त्री चिपळूणकरांची लेखमाला अगोदर सात आठ वर्षें प्रसिद्ध होत असल्यामुळें महाराष्ट्रांत नवा एक पक्ष तयार होत होता. कृष्णशास्त्री चिपळूणकर, रावबहादूर गोपाळराव हरी देशमुख, रावसाहेब रानडे वगैरे मंडळीच्या उद्योगानें, व्याख्यानांनीं आणि प्रत्यक्ष चळवळीनें जें लोक-शिक्षणाचें कार्य झालें होतें त्याचेंच एक इष्ट फळ शास्त्रीबुवांच्या लेखांनीं परिपक्व झालें होतें. आणि स्वतंत्र किंवा आपल्याच दृष्टीनें, हिंदुस्थानच्या स्थितीचा आणि सामाजिक, धार्मिक, राजकीय प्रश्नांचा विचार करणारा एक वर्ग तयार होत होता. सन १८७२ पासून १८८२ पर्यंत जे तरुण विद्यार्थी कॉलेजांत होते त्यांच्या मनांत आपल्या देशाची अवनत स्थिति आणि त्याचें प्राचीन वैभव यांतील दारुण विरोध बाणून गेला होता. आहे तें आणि असावें तें यांतील जमीन अस्मानाचें अंतर विचार करणाऱ्या व जिवन्त दृष्टीच्या तरुण मंडळींस स्पष्टपणें, कदाचित् तीक्ष्णपणें प्रतीत होत होतें. आहे तें तसेंच राहूं व चालूं दिल्यास हिंदुस्थानचें भवितव्य काय होईल याची भयंकर कल्पना त्यांना दुःसह झाली होती. महाराष्ट्राच्या सर्व वातावरणांत देशाभिमानाचें वारें वाहूं लागलें होतें. कॉलेजांत शिकत असणारे बहुतेक विद्यार्थी त्याच्या सपाट्यांत कमी अधिक आले होते, त्यांच्या विचारावर याचा ठसा विशेष जोरानें उठला. ते फुरसुतीच्या वेळीं आपल्या लोकांचा आणि देशाच्या स्थितीचा विचार करून थांबत नसत. चालू असलेली अधोगति थांबविण्याला

क. म. सं. ...

निदान तिचा भरधांव वेग कमी करण्याला आपण स्वतः कांहीं तरी केलें पाहिजे, असें त्यांना वाटूं लागलें. त्यांचे विचार हळूहळू दृढतर होऊं लागले. तेच ते विचार पुनः पुनः निरनिराळ्या प्रसंगांनीं निरनिराळ्या वेळीं मनांत येऊन त्यांचीं ठाम मतें होत होतीं, झालीं होतीं; कांहींची मजल याहीपुढें गेली होती. सरकारी नोकरी न धरतां कांहीं तरी स्वतंत्र उद्योग करावयाचा त्यांनीं निश्चय केला. कांहींनीं या साऱ्या अनर्थाचें मूळ, लोकसमाजाचें गाढ अज्ञान असें ठरवून तें दूर करण्याचे प्रयत्न आपण करावयाचे बेत केले. इंग्रजी शिक्षणावांचून लोकांचे डोळे उघडावयाचे नाहींत, त्यांना आत्मज्ञान व आत्मप्रत्यय व्हावयाचा नाहीं, आणि देशाचा ऱ्हास थांबावयाचा नाहीं, तेव्हां ‘ जें कांहीं आपणांस ठावें, तें आपल्या बांधवांना शिकवावें, शहाणे करून सोडावें, सकलजन ’ असे त्यांचे बेत झाले. पाश्चात्य ज्ञानाचा प्रसार करणें हाच तरणोपाय आहे. या विचारानें आपला जन्म त्या कामीं घालवावयाचा बेत करून प. वा. गोपाळराव आगरकर आणि श्रीयुत टिळक यांनीं प. वा. विष्णुशास्त्री चिपळूणकर व नामजोशी यांच्या मदतीनें पुण्यास

## न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना

केली. त्यावेळीं सरकारी नोकरी आतांप्रमाणें दुर्मिळ नव्हती. सरकारी नोकरींत शिरणें म्हणजे जन्म ऐषआरामांत घालवावयास सांपडून लक्ष्मीच्या गळ्यांतील ताईत बनणें होतें. मोठाले पगार व मोठाले अधिकार त्या वेळच्या पदवीधरांच्या मागें लागत म्हटलें तरी चालेल.

हा मार्ग ऐहिक दृष्टया सर्वतोपरी शहाणपणाचा आणि राजमान्य, तसाच लोकमान्य, असतांही तो सोडून या मंडळीनें आपला जन्म लोकशिक्षणाला वाहण्याची शपथ घेतली आणि त्याप्रमाणें सुरवातहि केली........"

विद्यार्थी हे राष्ट्रवृक्षाचीं बीजें होत त्यांची मशागत जितकी करावी तितकी थोडीच याकरितां नव्या मनूचें प्रवर्तन करणारे लोक नेहमीं तरुण शिष्यांच्या पिढीवर विश्वास ठेवितात. आणि ते स्वभाविकच आहे. शिवाय सुशिक्षित तरुणांना शाळा व कॉलेज यांचें खरोखरच मनापासून प्रेम वाटतें. विद्यादेवीच्या मंदिराचा गुणच तसा आहे. " पूर्वी काय किंवा आतां काय सुशिक्षितांत वकिलापेक्षां प्रोफेसरालाच मान अधिक यामुळें टिळकांना लोकसेवेला प्रारंभ करावयाचा तो एखादी शिक्षण संस्था स्थापूनच करावा असें वाटलें असावें"* एल् एल्. बी. ची परीक्षा पास झाली असतां आपल्या शिक्षणाचा समाजसेवेच्या कामीं इतर कांहीं तरी स्वतंत्र रीतीनें उपयोग करून पहावा, समाजाला सुशिक्षित करावें, असें मनांत येऊन शिक्षक होण्याचा टिळकांचा निश्चय झाला. तो अमलांत आणून समाजसेवेची एक नवी दिशा टिळकांनीं दाखविली. उत्तम शिक्षण हा उन्नतीचा पाया असल्यामुळें तो मुळापासूनच भरभक्कम पाहिजे अशी लो. टिळकांची ठाम समजूत होती. खुद्द त्यांचेच या बाबतींत काय धोरण होतें तें पहा. " कोणत्याही राष्ट्रांतील लोकांनीं तरुण पिढीच्या शिक्षणाचें काम आपल्या हातीं घेतल्याशिवाय तें कधीं नीट पार

* केळकर कृत टिळक चरित्र पान ९८ पहा.

पडत नाहीं. सरकारी शिक्षणाचा ओघ एकतर्फी व आकुंचित असतो आणि तशा तालमींत तयार झालेली मंडळी देशहिताकरितां जसे उद्योग करावयास पाहिजेत तसे करण्यास सरसावत नाहींत, वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन, व स्वतंत्र रीतीच्या शिक्षणाचा पाया घालून होईल तितक्या रीतीनें तें शिक्षण लोकप्रिय आणि स्वस्तें केल्यास ह्या दोषांचा कालांतरानें बराच प्रतिकार होईल या बुद्धीनें येथील न्यू इंग्लिश स्कूलची सन १८८० सालीं स्थापना झाली होती." * खरोखर अत्यंत कळवळ्यानें, व जनहिताच्या तळमळीनें स्वार्थत्यागी व्यक्तींनीं हातीं धरलेल्या कार्याला यश हें येणारच तीच गत न्यू स्कूलची झाली. शाळेच्या सुरवातीस शास्त्रीबुवा, टिळक आणि आगरकर होते. पण हळूहळू इतरहि होतकरू माणसे होती, व मिळत गेली त्यामुळें एकसारखी शाळेची भरभराटच होत गेली.

न्यू स्कूलची सारखी चलती होत गेली. हें खरें; परंतु लो. टिळकांचा न्यू. स्कूल स्थापन करून विद्यार्थी स्वतंत्र विचाराचे व राष्ट्रभक्त निपजावेत हा हेतु होता. पण शाळेच्या पुढील पुरस्कर्त्यांनीं बौद्धिक उन्नतीकडेच जास्त लक्ष दिल्यानें व परीक्षेला विशेष प्राधान्य दिल्यामुळें या शाळेचा व नंतर संस्थेचा टिळकांना संबंध सोडावा लागला. तरी पण तरुण पिढीला राष्ट्रीय शिक्षण देण्याची इच्छा कायमच होती, आणि म्हणूनच राष्ट्रीय शिक्षणासंबंधीं लोकांचीं मनें तयार करून निदान महाराष्ट्रापुरती तरी त्यांची कांहीं तरी कायमची व्यवस्था लावावी असा त्यांनीं संकल्प केला. महाराष्ट्रांतील मराठ्यांना

* लो. टि. केसरींतील लेख भाग २ पृष्ट ७३

खरोखरच समर्थ बनविण्यासाठीं ' समर्थ विद्यालयाचे पुनर्ज्जीवन करण्यांत मोठी मदत टिळकांनीं केली. त्याकरितां हजारो रुपयांचा फंड जमविला.

लोकशिक्षणाचा, लोकसेवेचा व समाजसुधारणेचा अधिक विशाल, चौफेर व राष्ट्रीय यत्न होणें त्यावेळीं फार अगत्य होतें. त्याप्रमाणें १८८१ सालच्या सुरवातीबरोबर म्हणजे जानेवारी महिन्यांत

## केसरी व मराठा

हीं पत्रें काढण्याचें शास्त्रीबुवा, टिळक, आगरकर व नामजोशी वगैरेंचें ठरलें. त्यांनीं हीं पत्रें काढलीं. याप्रमाणें लोकांमध्यें विद्येचा आणि सामान्य ज्ञानाचा प्रसार छापाख्यानें करण्याचा त्यांनीं उपक्रम केला. या नव्या धाडसानें सगळें महाराष्ट्र निनादून गेलें. या मंडळीचा देशाभिमान, लोकांचीं मनें उचंबळवूं लागला. जिकडे तिकडे या लोकांबद्दल अभिमान व आदर पसरला. वेळच्या वेळीं तीं पत्रें प्रसिद्ध होऊं लागलीं; व लौकरच प्रसिद्धीहि पण पावलीं. केसरी पत्र निघण्यापूर्वीच्या महाराष्ट्रांतील लोकमतांत व निघाल्या नंतरच्या लोकमतांत किती अंतर पडलें आहे हें गेल्या तीस वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासाकडे लक्ष दिल्यास कोणासही सहज समजेल. केसरी पत्र निघालें त्यावेळेपासून कांहीं दिवस त्यांत राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे बहुविध विषयांवर लेख येत असत; तरी पण तेव्हांहीं राजकीय, विषयांचीच विशेष माहिती करून देण्याकडे त्याची विशेष प्रवृत्ति होती; टिळक यांचें हातीं तें पत्र पूर्णपणें आल्यावर त्यांची या बाबतींत कायम दिशा ठरून आज मित्तीसही तें याच दिशेनें

जात आहे. " राजकीय बाबतींत महाराष्ट्रांतील लोकांची विचार-क्रांति होण्यास ज्या कित्येक गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत त्यांत केसरी पत्र मुख्य असून त्याकडेच अग्रेसरत्वाचा मान येईल. हा मान केसरीस मिळण्यास त्याचें चालकत्व टिळक यांजकडे असून त्यांच्या अंगचें विद्याव्यासंग, कायद्यांमधील प्रविणता, स्वार्थत्याग, लोकां-विषयीं खरी कळकळ, अंग मोडून मेहनत करणें, इत्यादि गुणच कारणीभूत आहेत यांत शंका नाहीं. ....राजकीय प्रश्नांचा उहापोह करतेवेळीं अनेक प्रसंगीं निरनिराळे सरकारी रिपोर्ट, कागद पत्र व ठराव वाचल्याशिवाय ते रहात नसत; व त्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांच्या चुका व राज्यपद्धतींतील दोष मुद्देसूद रीतीनें व सप्रमाण ते दाखवित असत. " * लो. टिळकांची लेखनशैली फार श्रेष्ठ दर्जाची होती. त्यांच्या लेखांत विशेष हें आहे कीं त्यांत ठिक-ठिकाणीं महत्वाचे विचार व सिद्धांत ग्रथित केलेले आहेत. सिद्धांत व महत्वाचे विचार हें भारदस्त लेखांचें जीवन. मराठी वर्तमान पत्राच्या आजपर्यंतच्या इतिहासाकडे पाहिलें म्हणजे अशा प्रकारचे भारदास्त रीतीनें लिहिलेलें लेख फारच थोड्या पत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत. केसरीला विशेष महत्त्व आलें व आहे तें ह्याचमुळें. १८८० ते अदमासें १९०० पर्यंत, बर्वे प्रकरण, क्राफर्ड प्रकरण, संमतीवयाचा कायदा, राजद्रोहासंबंधानें वर्तमानपत्रांवर सरकारनें केलेलें अनेक खटले, इत्यादि वर्तमानपत्रांच्या बाल्यावस्थेंत, लोकमतांत खळबळ, सदनशीर चळवळ, व जागृति करणारे विशेष महत्त्वाचे विषय होते. त्यानंतर जमीनमहसुलाचा कायदा, एडवर्ड बादशहांचें राज्यारोहण,

* लो. टिळकांचीं गेलीं आठ वर्षें पान १२

दिल्लीदरबार, गोप्यगोपनाचा व युनिव्हार्सिट्यांचा कायदा, वंगभंग स्वदेशी चळवळ, या बहुविध विषयांवर टिळकांच्या सरस्वतीचा प्रवाह व प्रभाव असा कांहीं जोरानें वाहत चाललेला दृष्टीस पडेल कीं तो पाहून वाचकांचें मन थक्कच होईल. "राजकीय बाबतींत चळवळ करणें व त्यासंबंधानें लोकमतास एक प्रकारचें विशिष्ट स्वरूप देऊन त्यांत जोम आणणें हा केसरीचा मुख्य हेतु असल्यामुळें त्यांचे अग्रलेख याच धोरणानें लिहिले जात असत; व त्यामुळें या लेखांत जितकें शास्त्रशुद्ध स्वरूप देतां येईल तितकें देण्याचा टिळक यांचा प्रयत्न असे."* खरोखर अग्रलेखाचा मथळा घालण्याची त्यांची कल्पकता, खुबी व चातुर्य तर नामीच होतें. तें फारच थोड्यांना साधेल. कित्येक प्रसंगीं त्यांनीं असे कांहीं सूचक मथळे योजिले आहेत कीं त्यानें लेखांचें निम्में कार्य झालें आहे. नोकरीच्या व्यवहारास जरूर लागतील तसलेच शिक्षक तयार होतील अशा विषयीं कल ठेऊन युनिव्हर्सिटी कमिशननें ज्या सूचना केल्या होत्या, त्यासंबंधानें लिहितांना "युनिव्हर्सिटया उर्फ सरकारी हमालखाने" असा मथळा घातला आहे. "शाळांतून धार्मिक शिक्षणाची आवश्यकता आहे काय, या विषयावर रँग्लर परांजपे यांनीं 'ईस्ट अँड वेस्ट' या मासिक पुस्तकांतून जेव्हां एक लेख प्रसिद्ध केला तेव्हां धार्मिक शिक्षणानें राष्ट्राची हानी होईल, धर्म म्हणजे वेडगळ समजुतींचा भारा आहे, इत्यादि त्यांत केलेल्या विधानांनीं लोकांची मनें कलुषित होतील– विशेषतः महाराष्ट्रांतील एका उच्च विद्यापीठांतील प्रिन्सिपालच्या लेखणींतून निघालेल्या विधानांनीं जास्त कलुषित होतील–असें वाटून

* लो. टिळकांचीं गेलीं आठ वर्षें पृष्ट ३३.

[library stamps]



त्यांचा निषेध करण्याच्या हेतूनें तयार झालेल्या लेखांवर त्यांनीं ' प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते ' असा मथळा घातला आहे. *

सरकारवर रास्त टीका टिळकांनीं अनेक वेळां केली आहे. त्यांची टीका विशेष निस्पृहणाची, व निर्भयतेची असून त्यांत कायद्याचें विशद ज्ञान व त्यांतील बारीक खाचाखोचा आणि सूक्ष्म डावपेंच हींही पण नजरेस पडतात. हिंदुस्थानच्या दारिद्र्याबद्दल लिहितांना टिळकांनीं सरकारला पुढील प्रश्न रोखठोक टाकला आहे. " जोंपर्यंत हिंदुस्थानांतून प्रतिवर्षी चाळीस कोट रुपये आर्थिक मोबदल्याखेरीज बाहेर जात आहेत, जोंपर्यंत दुष्काळाचा प्रतिकार रिलीफ कामांखेरीज अन्य रीतीनें करण्याचें मनांत येत नाहीं, व जोंपर्यंत हिंदुस्थानांतील लोकांस उल्हास, धैर्य, संपत्ती वगैरे बाबतींत लंगडे पांगळेच ठेवण्याचें सरकारचें धोरण आहे, तोंपर्यंत या राज्यव्यवस्थेबद्दलचें लोकांचें मत कधींही चांगलें व्हावयाचें नाहीं, अगर ते अथवा त्यांचे पुढारी संतुष्ट राहणार नाहींत. हा असंतोष लोकांच्या मनांत जागृत आहे, जळत आहे; आणि त्याच्या ज्वाला प्रकृतिमानाप्रमाणें कोठें सौम्य, कोठें तापट, तर कोठें बीभत्स रीतीनें बाहेर पडत आहेत. " तसेंच हिंदुस्थानांतील लोकनायकांचे मुख्य कर्तव्यकर्म काय आहे याची जाणीव टिळकांना किती जाज्वल्य होती तें पहा. "... हिंदुस्थानांतील प्रजेची स्थिति हल्लीं याच मासल्याची झालेली आहे; व या प्रजेचें जे पुढारी आहेत त्यांनीं ही स्थिति सरकारच्या व लोकांच्या

* लो. टिळकांचीं गेलीं आठ वर्षे पृष्ठ ३७

लक्षांत आणून देणें व ती सुधारण्याचें उपाय सुचविणें व करणें, हें त्यांचें कर्तव्य होय." सुदैवानें बोलल्याप्रमाणें अक्षरशः किंबहुना थोडेबहुत जास्तच करण्याचें लो. टिळकांचें ब्रीद असल्यामुळें त्यांनीं हें लोकाग्रणीचें कर्तव्य उत्तम तऱ्हेनें बजाविलें.

लो. टिळकांची सार्वजनिक चळवळ बहुविध होती. त्या मानानें त्यांचे केसरींतील लेखही अनेक विषयांवर असत. युरोपियन चाकरांपेक्षां हिंदु नोकरांच्या संख्येचें प्रमाण शेंकडा अधिक वाढलें आहे. यावरून वाढलेल्या नोकरांचे मालक हिंदूच आहेत, असा सरकारनें नोकऱ्यासंबंधानें एक ठराव काढून कोटीक्रम केला होता. त्यावर टिळकांनीं असा सुरेख कोटीक्रम लढविला कीं सरकारचीं बोटें सरकारच्याच डोळ्यांत खुपसलीं. "शेंकडा अमुक जागा सरकार नेटिवास देतें या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. घरांत यजमानापेक्षां नोकरच जास्त असतात; पण तेवढ्यावरून म्हणजे घरांतल्या एकंदर माणसांच्या मानानें पहिलें तर शेंकडा नोकरांचें प्रमाण जास्त आहे अशी कोटी करून हें सर्व घर नोकरांचेंच आहे; यजमान काय दररोज पावशेर भात खाऊन राहतो, असें जर कोणी प्रतिपादन करूं लागला तर त्याचा कोटीक्रम जितका हास्यास्पद होईल तितकाच हिंदुस्थान सरकारच्या ठरावांतील कोटिक्रम हास्यास्पद, भ्रामक आणि चुकीचा आहे." अशा निरनिराळ्या, थोडक्यांत पण चटकदार लिहिण्याच्या शैलीनें, भाषांतराच्या हातोटीनें, शब्दांच्या खुबीनें, टिळकांनीं सरकारच्या, समाजाच्या, लोकांच्या कित्येक चुका मुद्देसूद रीतीनें, खऱ्या अंतःकरणाच्या कळवळीनें, मनाच्या तळमळीनें दाखवून दिलेल्या आहेत. योग्य मार्ग, रास्त उपाय सांगितले आहेत.

"बॉयलरांत वाफ कमी असेल तर शिटीचा आवाज निघावा तसा निघत नाहीं; तीच वाफ भरपूर असली म्हणजे ती जास्त जोरानें वाजते याप्रमाणेंच सरकारनें लोकहितार्थ अमुक करावें, तमुक करावें असें अंत:करणपूर्वक यांना वाटत असल्यामुळें सरकारचें राजकीय धोरण चुकून त्यानें प्रजेस व त्याबरोबर सरकारास अपाय होत असेल, तर सरकारास कळकळीचा आणि स्पष्टपणाचा सल्ला सांगण्यांत त्यांनीं ( टिळकांनीं ) कधींहीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. खरी राजनिष्ठा ती यांतच आहे." *

याशिवाय केसरीद्वारें सुराज्य व स्वराज्य, अध्यक्षांचे अधिकार, सनदशीर चळवळ, वगैरे लेख लिहून आणि धुळ्याच्या प्रांतिक सभेंत राजकीय चळवळींत एकीनें काम कसें करितां येईल याची योग्य दिशा दाखवून, स्पष्टीकरण करून त्यांनीं लोकांना जें शिक्षण दिलें तें लो. टिळकांच्या विधायक कार्यक्रमापैकींच एक बरेंच मोठें कार्य आहे. त्यावेळीं केसरी म्हणजे सामान्य जनतेला राजकीय शिक्षण देणारी शाळाच होती. केसरींत, राजकीय प्रश्नांची सांगोपांग माहिती, राजकीय विषयांची साध्या शब्दांत चर्चा, तसेंच सरकारानें एखादा कायदा अगर सुधारणा केली तर त्यांत सरकारचा हेतु काय आहे व त्यांत प्रजेचें हित कितपत आहे वगैरे उपयुक्त विषय येत असत. प्रजेच्या हिताच्या दृष्टीनें कोणत्या सुधारणा, कायदे व चळवळी योग्य आहेत याचाही केसरींत मधून मधून खल होत असे. थोडक्यांत चौफेर चळवळीस योग्य अशी मनोभूमिका—सर्वसाधारण जनतेची मनोभूमिका—केसरीद्वारें तयार होत असे.

---

* लो. टिळकांचीं गेलीं आठ वर्षें पान ६६.

मराठी भाषा जाणणाऱ्या लोकांकरितां ज्याप्रमाणें केसरी निघाला, त्याचप्रमाणें इंग्रजी येत असलेल्या लोकांकरितां ' मराठा ' प्रसिद्ध होऊं लागला. इंग्रजी भाषेंतील वर्तमानपत्रांकडे हरएक प्रकाऱ्च्या लोकशिक्षणाचें काम तर आहेच; पण लोकांचें काय म्हणणें आहे, त्यांच्या अडचणी, त्यांच्या गरजा काय आहेत, इत्यादि अनेक गोष्टी सरकारच्या कानावर घालण्याचें--त्यांतल्या त्यांत राजकीय विषयांची सार्वजनिक दृष्टया चर्चा करण्याचा पत्कर ज्या पत्रानें पतकरला आहे त्याचें--कर्तव्य आहे. मराठी पत्रांतील लेखांचीं भाषांतरें होण्यास व नंतर तीं सरकारच्या कानावर जाण्यास किती तरी वेळ लागतो. तसा अवधी या इंग्रजी पत्रांचे कामीं न लागतां, व दुसऱ्या दुभाष्याची जरूरी न लागतां आपलें मागणें व सांगणें सरकारास चटकन् कळवितां येतें. याशिवाय एका प्रांतांतील लोकांचे विचार परप्रांतांतील लोकांस कळण्यास इंग्रजी पत्र हेंच हल्लीं मुख्य साधन आहे. इंग्लंडच्या पार्लमेंटमधील सभासदांना हिंदुस्थानची वस्तुस्थिति इंग्रजी पत्रानेंच समजणार; आणि हिंदुस्थानच्या कल्याणाकरितां झटणारे व हिंदुस्थानचे आपणांस मित्र म्हणविणारे जे कांहीं पार्लमेंटचे थोडे सभासद असतील त्यांना तर अशा इंग्रजी पत्रांचा विशेषच फायदा होणार. त्याबरोबरच देशांतील बहुविध चळवळीस जोम येण्यास हल्लीं व त्यावेळींसुद्धां अति उपयोगी असत. इंग्लंडमध्यें वर्तमानपत्रांचा जसजसा जारीनें प्रसार होऊं लागला तसतसा सार्वजनिक चळवळीचा ओघ चौफेर पसरला; लोकांमध्यें जागृति झाली. इत्यादि देशहिताच्या फायद्याकडे पाहून टिळककांनीं ' मराठा ' पत्र हें मुद्दाम नुकसान असतांहि अंगावर ठेविलें. ' मराठा ज्या जोमानें चालविला तो जोम, ती धडाडी लक्षांत घेतां टिळक केवळ स्वदेशहिताच्या कळकळीनेंच

ही झीज सोसण्यास तयार झाले होते असें कोणासहि वाटल्यावांचून राहणार नाहीं. देशाकरितां मराठ्यानें टिळकांच्या वेळीं अप्रतिम कामगिरी केली. "गेल्या आठ वर्षांत ( १९००–१९०८ ) जमीन-महसूल, गौप्यगोपन, युनिव्हर्सिटी वगैरेसंबंधीं जे अनेक कायदे पास झाले व दिल्लीदरबार, बंगभंग, स्वदेशी चळवळ, वगैरेसारखे जे प्रसंग घडले त्यावेळीं 'मराठ्या'नें ही कामगिरी किती अप्रतिम रीतीनें बजाविली हें त्या पत्राच्या फायली चाळल्या असतां कोणासहि दिसून येईल. राज्यपद्धतींतील दोषांबरोबर आमच्या पुढाऱ्यांच्या विचारांतील आणि वर्तनांतील दोषाविष्करणही 'मराठ्या'नें वेळोवेळीं केलें आहे. हें राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद, स्वदेशी चळवळ, राष्ट्रीय शिक्षण, वगैरे त्यांत जे लेख आले आहेत त्यांवरून कळून येईल; व धर्म आणि नीति यासंबंधानेंही आपले उच्चतम विचार गणेशोत्सव, बिझांटबाई व मिसेस् स्टॅनर्ड यांचें पुण्यास आगमन, रँग्लर परांजपे यांचा 'ईस्ट अँड वेस्ट'मधील लेख वगैरे प्रसंगीं उत्तम रीतीनें व्यक्त केले आहेत.........लेखांचें धोरणहि सामान्यपणें केसरींतील विचारांच्या दिशेप्रमाणें, व धोरणाप्रमाणेंच असून ती स्वाभिमान, स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान प्रेरक असतात." *

थोडक्यांत, तिलक-विरहगीताञ्जलींत श्रीयुत गो. पां. देवधर यांनीं म्हटल्याप्रमाणें टिळकांचा "मराठा"

**"देशासाठीं समर करुनी वीर झुंजार मोठा,**
**धैर्योत्कर्षे निज 'मरहट्टा' गाजला तो मराठा."**

---

* लो. टिळक गेलीं आठ वर्षे पृष्ठ ८८.

सारांश, पत्रकर्त्यांच्या अंगीं कोणकोणते गुण असले पाहिजेत, पत्र कसें व कोणत्या धडाडीनें चालवावें, पत्राच्या योगानें लोकमत आपल्या बाजूस कसें वळवून घ्यावें हा बोध घेणारांनीं संपादक टिळक आदर्श ठेवावे.

खरें पाहिलें असतां लो. टिळक यांचें बहुतेक आयुष्य लेखनांत व विचारांत गेलें आहे, व त्यांच्या लेखांनीं आणि विचारांनीं लोकसमाजावर जें कार्य झालें आहे तें इतर कार्याहून श्रेष्ठ आहे. लो. टिळकांविषयीं प्रि. पाध्ये यानीं नमूद केलें आहे, तें अक्षरशः खरें आहे, " पण हें मात्र खरें कीं, देशाच्या सांप्रतच्या अति बिकट राजकीय परिस्थितींत जितका खटाटोप अनन्यपरायणरीतीनें न मागणारी अशी राजकीय परिस्थिति देशाची असती तर, टिळक हे चतुर राज्यकर्ते म्हणून जितकी कीर्ति मिळवितें त्याहूनहि अधिक कीर्ति सरस्वतीचे आवडते भक्त व जगाच्या ज्ञानांत आणि वाङ्मयांत महत्वाची भर घालणारे अपूर्व शोधक, लेखक, व ग्रन्थकर्ते म्हणून प्राप्त करून घेते. त्यांनीं विकट परिस्थितींतहि ह्यासंबंधीं मिळविली ती कीर्ति अल्प नव्हती. व त्यांची तेवढीहि

## देवी सरस्वतीची सेवा

पुष्कळ मोठी व अनेक समकालीन बुद्धिवंतांस लाजविणारी आहे. आर्टिक समुद्राजवळील आर्यांचें " मूळ वसतिस्थान " व "ओरायन किंवा वेदांचें प्राचीनत्व " ह्या ग्रन्थांची शोधकतेच्या दृष्टीनें किंमत पुष्कळ आहे. त्याहूनहि श्रेष्ठ दर्जा तत्त्वज्ञानी व वाङ्मयविहंग ह्या दृष्टीनें त्यांच्या 'गीतारहस्य' ग्रन्थाची आहे." *

* प्रि. पाध्येकृत लो. टि. पान ४३.

लो. बाळ गंगाधर टिळक यांनीं केलेली सरस्वतीसेवा विधायक स्वरूपाची नाहीं असें कोण म्हणेल ?

राष्ट्राच्या प्रगतीस

**धार्मिक**

शिक्षणाची अत्यंत अवश्यकता आहे असें लो. टिळक यांचें मत होतें. कर्तव्याची जाणीव, थोर सहिष्णुता, अचाट दीर्घोद्योग, निस्सीम स्वार्थत्याग इत्यादि अमोलिक तत्त्वें आमचा धर्म--सनातन धर्म-- आम्हांस शिकवीत असून धर्माचा आधार असल्याशिवाय कोणतीहि सुधारणा नीट तडीस जाणें प्राय: अशक्यच. अशा तऱ्हेचें उद्गार लो. टिळकांनीं ता. ५ मे १९०३ व ९।१।१९०४ वगैरे केसरींतून प्रदर्शित केले आहेत. ते उद्गार कळकळीनें मूर्तिमन्त भरलेले आहेत, अती जिव्हाळ्याचे आहेत; त्यांत धर्मैक्याची अवश्यकता आहे. तें कसें घडवून आणितां येईल, तसेंच शाळांतून धर्मशिक्षण कसें देतां येईल, शिवाय उपदेशापेक्षां नैतिक किंवा धार्मिक आचरणाचा ठसा लोकांच्या मनाला मानवतो, किती नामी उमटतो, हृत्पटलावर बिंबतो, भगवद्गीता काय सांगते, वगैरे विचार लो. टिळकांनीं उत्तम रीतीनें प्रतिपादन केले. राष्ट्रांत धर्मजागृती होऊन तिची अनेक तऱ्हेनें उन्नति होण्यास उत्सव हें एक सुरेख साधन आहे. ऐक्याची वृद्धि होण्यास एक उपास्य असणेंहि अत्यंत इष्ट आहे. हिंदु लोकांतील निरनिराळ्या जाती एके ठिकाणीं जमून चार दिवस आनंदानें बोलतील, मजेनें बसतील, सुखानें घालवितील विचार करतील असें पवित्र पीठ,—परम पवित्र पीठ म्हणजे

## सार्वजनिक गणेशोत्सव.

प्रत्येकानें आपापल्या घरांत उत्सव करण्यापेक्षां सार्वजनिक रीतीनें उत्सव करणें अधिक हितावह आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाची स्थापना टिळक यांच्या हातूनच प्रथम झाली. व त्यांचेंच अनुकरण महाराष्ट्रांतील सर्व लोकांनीं केलें. उत्सव सुरू करण्यास हिंदुमुसलमानांतील दंगे जरी प्रत्यक्ष कारण झाले असले तरी उत्सवाचा उद्देश हिंदुमुसलमानांतील दुही वाढविण्याचा नसून राष्ट्रैक्य करण्याचा आहे. जुन्या जोत्यावर नवी इमारत बांधल्याप्रमाणें हा उत्सव असल्यामुळें लवकरच लोकादरास तो पात्र झाला. महाराष्ट्रीयांचें चित्त त्याकडे वेधलें.

थोडक्यांत, नव्या जुन्या लोकांचें संमेलन होऊन धर्मजागृती करण्यास गणेशोत्सव पुष्कळ अंशीं कारणीभूत झाला आहे. धर्मजागृतीस मेळे, मिरवणुकीसारख्या गोष्टींची विशेष गरज काय आहे? असा प्रश्न कोणी करितात, त्यांस उत्तर एवढेंच कीं, अज्ञ लोकांना अशा गोष्टी अगत्य कळल्या पाहिजेत. निराकार ईश्वराचें स्वरूप ध्यानांत येण्यापूर्वीं साकार ईश्वराच्या स्वरूपाची जशी जरूरी आहे, तसेंच धर्मसंबंधीं स्थूल गोष्टी—ज्या लोकांना आवडतील, पटतील, त्यांच्या विचाराला, मनाला मानवतील—सामान्यजनापुढें आल्या पाहिजेत. आणि म्हणून मेळे व मिरवणुकीसारख्या बाह्यांगांचीहि आवश्यकता आहे. एकदां लो. टिळक असें म्हणाले कीं, “ धर्मसंबंधीं विचार किंवा ईश्वराची भक्ति ही एकांतांत बसून केली तरी चालते. पण सामान्य जनांच्या जागृतीसाठीं थाटमाट किंवा समारंभ

( Demonstration )अवश्य पाहिजे. " अनेक व्याख्यांनानीं व कित्येक लेखांनीं लो. टिळकांनीं एकंदरींत धर्मजागृती बरीच केली.

गणेशोत्सव जसा धर्मजागृतीकरितां, तसा शिवाजी उत्सव राजकीय प्रगतीकरितां. हिंदु मुसलमानांचें दंगे हे ज्याप्रमाणें गणेशोत्सवास अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष रीतीनें कारण झाले, त्याप्रमाणें एका इंग्लिश अधिकाऱ्यानें रायगडावरील श्रीशिवाजी महाराजांच्या जीर्ण समाधीचें वर्तमानपत्रांत केलेलें वर्णन शिवाजी—उत्सवास कारणीभूत झालें.

आपल्या थोर पूर्वजांचें स्मरण, त्यांच्या सत्कृत्यांची आठवण, त्यांनीं केलेल्या अचाट उद्योगांचें मनन, त्यांच्या निस्सीम स्वार्थत्यागाची जाणीव, हीं जागृत असणें हें राष्ट्राच्या जिवंतपणाचें लक्षण आहे. त्यांच्या भावी उन्नतीचें तें बीज होय. हिंदुस्थानसारख्या सर्वांगांनीं खालावलेल्या परतंत्र झालेल्या राष्ट्रानें शिवाजीसारखी अलौकिक विभूति विसरून कसें चालेल ? यवनांनीं अखिल देश पादाक्रांत करून हिंदूचा छळ चालविला असतां श्रीशिवाजी महाराजांची विभूति

**" परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ "**

याप्रमाणें अवतीर्ण होऊन त्यांनीं, धर्म नीति, व स्वातंत्र्य यांचा जीर्णोद्धार केला. अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली. वाळूच्या कणांचा दोर करून दाखविला. मराठी राज्य स्थापिलें हिंदु पातशाहीची आकांक्षा धरिली. हिंदूस प्रगतीचा मार्ग करून

दिला. हिंदुसमाजाचें मूळ अस्तित्व नष्ट होण्याचा घोर प्रसंग आला असतां ज्यानें स्वपराक्रमानें राष्ट्रांत जीव घालून त्यास राष्ट्रीयत्व दिलें, त्या शिवाजी महाराजांचा उत्सव आपण अवश्य केला पाहिजे; आपलें तें परम पवित्र कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें केवळ अज्ञानामुळें अगर एकतर्फी माहितीवरून 'शिवाजी एक लुटारू होता.' वगैरे झालेल्या कित्येक परदेशी व देशी लोकांच्या कल्पना किती चुकीच्या व कोतेपणाच्या आहेत तें दाखवून देणें पण आपलें कर्तव्य आहे. वरील कोत्या, व चुकीच्या कल्पना अजिबात जरी नसल्या तरी जवळ जवळ बदलत चाललेल्या आहेत. शिवाजी महाराजांच्या वेळची परिस्थिति काय होती, हिंदु राष्ट्राला—महाराष्ट्राला—वर आणण्याकरितां त्यावेळीं त्यांनीं काय उपाय योजिले त्याचें मनन करून केवळ कृतज्ञता प्रगट न करतां हल्लींची स्थिति ओळखून राष्ट्रीयत्वाची कल्पना किती विस्तृत केली पाहिजे, आजच्या अडचणी, आजच्या गरजा, आजची अवनती कोणत्या थराला गेली आहे, व त्यांतून वर डोकें काढण्यास कोणते मार्ग आहेत याचाहि विचार हा उत्सव करणारांनीं केला पाहिजे. शिवाजी महाराजांचा अवतार केवळ धर्मोन्नती करण्याकरितां नव्हता, किंवा नुसती राजकीय उन्नति करण्याकारितां नव्हता, तर एक राष्ट्रीयत्व ज्या गोष्टींनीं येतें त्या गोष्टी राष्ट्रास देण्याकरितां होतां; ही गोष्ट उत्सव करणारांनीं अवश्य लक्षांत ठेऊन तदनुरोधानें या उत्सवाचें धोरण ठेविलें पाहिजे, असें टिळकांचें मत असून, तें १९०५ सालच्या उमरावती व पुणें येथील

**शिवाजी—उत्सव**

प्रसंगीं आणि १९०६ सालच्या कलकत्त्यांतील उत्सवांत प्रगट केलें

आहे. उमरावती येथील भाषणांत ते म्हणतात "......मोठ्या पुरुषांचे उत्सव करावयाचे तर छत्रपति शिवाजीचाच उत्सव आपण कां करावा, नेपोलियन बोनापार्ट किंवा वाशिंगटन यांचा कां करूं नये, अशीही एक शंका कित्येक घेत असतात. परंतु परदेशांतील महापुरुषापेक्षां आमच्याच पूर्वजांपैकीं किंवा ज्यांचें रक्त आमच्या अंगांत खेळत आहे अशा महापुरुषांचेच उत्सव आपणांमध्यें कर्तव्य जागृती करण्यास अधिक उपयोगी पडतात, हें तत्व वरील शंका घेणारे गृहस्थ विसरतात. आमच्या लोकांत कांहीं कर्तबगारी आहे कीं नाहीं हें दाखविण्यास दुसऱ्याचें उदाहरण काय उपयोग ?. एका ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं, एशियांतील लोक नेभळे आहेत; त्यांच्या-च्यानें राष्ट्रीय कृत्य कांहीं एक व्हावयाचें नाहीं. हा भ्रम जपाननें नुकताच दूर केला आहे. पण आपण याचा पूर्वीच जर विचार केला असतां तर आपला भ्रम शिल्लक राहताना. आमच्याच लोकांच्या सहाय्यानें आपण जित झालों आहों हें आतां नव्यानें सांगावयास नको. सेनानायकत्वही करण्याचें आमच्या अंगीं सामर्थ्य आहे; परंतु विपरीत परिस्थितीमध्यें आपण पडल्यामुळें तो गुण दिसून येत नाहीं......सारांश, छत्रपति शिवाजीच्या उत्सवानें आपल्या अंगचे झांकलेलें गुण प्रगट होण्यास जसें उत्तेजन मिळेल किंवा छत्रपतीच्या उत्सवानें जशी आपली प्रगति होईल तशी परकीय वीरांचे उत्सव केल्यानें कधींही होण्याची आशा नको हें निर्विवाद आहे......आपल्या राष्ट्राची परिस्थिति लक्षांत आणून आपल्या कर्तव्याची दिशा जशी छत्रपति शिवाजीनें बदलली तशी आपणासही हल्लींची परिस्थिति लक्षांत आणून आपल्या कर्तव्याची दिशा

३०३२

आपणांस बदलली पाहिजे. प्रगतीच्या मार्गांत आलेला अडथळा काढून टाकणें हाच खरा पुरुषार्थ. छत्रपति शिवाजीनें अशाच प्रकारची कामगिरी केली व म्हणूनच हिंदुस्थानांतील लोक त्याचा उत्सव करितात........"

शिवाजी—उत्सव हा राष्ट्रीय उत्सव होईल कीं नाहीं, असा १९०६ साली प्रश्न निघाला होता. टिळक यांचें मत हा उत्सव राष्ट्रीय होऊं शकेल असें होतें. तसेंच राष्ट्रीयत्वाची कल्पना जागृत होऊन ती जसजशी वृद्धिंगत होत जाईल तसतशी शिवाजी—उत्सवाची महती वाढेल असें नाहीं. तर अकबरासारख्यांचा उत्सवही सुरू होईल. थोर पुरुषांच्या अंगचे कित्येक गुणच असे असतात कीं, ते राष्ट्रांतील विस्कळीतपणा मोडून राष्ट्रैक्य करितात.

प्रथम कुलाबा जिल्ह्यांतील जंगल अधिकाऱ्यानें, नंतर डगलस साहेबानें व मग गो. वा. जोशी वसईकर यांनीं रायगडावरील श्री. शिवाजीमहाराजांच्या समाधी जीर्णोद्धाराकडे लक्ष पुरविलें, कित्येक खटपटी केल्या; जनक जरी नसले तरी शिवाजी-उत्सवाचे प्रथम पुरस्कर्ते लो. टिळकच होते. श्रीराम वगैरे देवादिकांच्या मंदिराप्रमाणें श्री शिवाजीचें मंदीर असावें अशी टिळकांची फार इच्छा होती. शिवाजी महाराजांचा घोड्यावर बसलेला असा एक भव्य व प्रेक्षणीय पुतळा उभा करावा अशी त्यांची आकांक्षा होती. 'फूल नाहीं फुलाची पांकळी' या न्यायानें, या कल्पनेचें थोडें दृश्य स्वरूप खुद्द त्यांच्या हयातींतच त्यांना दृष्टीस पडलें. आज जे शिवाजी—मंदिर दिसत आहे, जी अनेक उत्सवांची सार्वजानिक जागा झाली आहे, व पुढेंही होईल, तिची मूळ कल्पना टिळकांची होती, हें विसरून चालणार नाहीं.

सन १८८५ त जन्म झालेल्या

**राष्ट्रीय सभेचे**

पुरस्कर्ते, चालक आणि नंतर आधारस्तंभ टिळक होते. प्रथम प्रथम तर राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी टिळकच होते. मुंबईस भरलेल्या एका राष्ट्रीय सभेंत विचारवंत पुढारी म्हणून टिळकांनीं नांव मिळविलें राष्ट्रीय सभेच्या कार्यक्षमतेवर टिळकांचा दृढ विश्वास होता. ती सभा दिवसेंदिवस बळवान होत जावी अशी त्यांची मनीषा असे. केसरींतील त्यांचें लिहिणेंहि त्याच धोरणाचें असें.

राष्ट्रीय सभेचें काम काय, या ठिकाणीं तारीख ३०।१२।१९०४ च्या केसरींत टिळक लिहितातः—" सभा स्थापन होण्यापूर्वी ज्या निरनिराळ्या राजकीय संस्था होत्या त्या या सभेंत एकवटून गेल्या इतकेंच नव्हे, तर ज्या इलाख्यांत तशा प्रकारच्या संस्था नव्हत्या तेथें राष्ट्रीय सभेच्या शाखा म्हणून त्या उत्पन्न झाल्या; आणि त्याबरोबरच सर्व देशभर एक प्रकारची राष्ट्रीय उन्नतीसाठीं कळकळ उत्पन्न झाली. तसेंच निरनिराळ्या इलाख्यांतील व प्रांतांतील लोक एके ठिकाणीं आल्यानें त्यांच्यामधील दळणवळण व स्नेहभाव वाढून एककार्यत्वामुळें एकराष्ट्रीयत्वाची बुद्धिही अधिकाधिक जागृत होत चालली. आपले हक्क काय, हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य न मोडतां आपणांस कोणत्या प्रकारें राज्यकर्त्यांच्या हक्कांची बरोबरी करून घेतां येईल, किंवा आपली राजकीय उन्नति किती व कशी होईल या गोष्टींचा वीस वर्षे खल होऊन आमच्या हक्कांची व मागण्यांची दिशा बहुतेक

गोष्टीचा ठरून गेली.······तीस कोट लोकांची एकवाक्यता करणें कांहीं लहानसहान काम नव्हे. व तत्प्रीत्यर्थ झालेला खर्च अनाठायीं झाला असें म्हणतां यावयाचें नाहीं; किंबहुना अद्यापहि देशांतील राष्ट्रीय एकीचें काम बरेंच पुरें व्हावयाचें आहे. राष्ट्रीय सभा निघाली तेव्हां आमचे मुसलमान बंधु तिला प्रतिकूल होते. पण गेल्या वीस वर्षांत मुसलमान लोकांत शिक्षणाचा जो प्रसार झाला आहे त्यामुळें राष्ट्रीय सभेचें महत्त्व व उपयुक्तता त्यांच्या ध्यानांत येऊं लागली आहे; व हल्लींच्या धोरणावरून असें दिसून येतें कीं, लवकरच मुसलमान लोकही राष्ट्रीय सभेस येऊन मिळतील. राष्ट्रीय सभेचे उद्देश हल्लीं-पेक्षांहीं लोकांस जास्त माहित होण्याबद्दल आणखी या देशांतच खटपट व्हावयास पाहिजे हें खरें आहे······"

तसेंच सन १९०६ सालच्या २२ व्या राष्ट्रीय सभेंत, " स्वराज्य—लोकांनीं आपण होऊन चालविलेलें स्वराज्य—आपणांस प्राप्त झाल्याखेरीज आपल्या उद्धाराचा दुसरा मार्ग नाहीं. " असें ठरलें या संबंधानें टिळक यांनीं ता. ८।१।१९०७ च्या केसरींत पुढील मत प्रदर्शित केलें आहे:— " हिंदुस्थानास स्वराज्य मिळालेंच पाहिजे एरव्हीं गत्यंतर नाहीं, हें आमच्या राजकीय चळवळीचें आतां कायमचें प्रधान तत्व बनलें आहे. आणि आजपर्यंत एकवीस वर्षांत राष्ट्रीयसभेच्या पूर्वीच्या अध्यक्षांनीं या बाबतींत जी कांहीं घरसोडीचीं विधानें केलीं आहेत तीं आतां सर्व रद्द झालीं आहेत. खुद्द दादाभाई यांनींच असें सांगितलें कीं, २२ व्या राष्ट्रीय सभेंत नवें म्हणून जें काय झालें तें हेंच होय. स्वराज्य प्राप्त करून घेणें हेंच तुमचें कर्तव्य आहे, असा सिद्धांत मी या सभेंत तुम्हांस सांगतों; आणि तत्प्रीत्यर्थ

तुम्ही काम करून हा हक्क संपादन करा म्हणजे मी आजपर्यंत जें कांहीं केलें त्याचें मला बक्षीस मिळालें; असा त्यांचा आम्हां सर्वांस अखेरचा निरोप आहे. आणि हा निरोप एकजुटीनें अमलांत आणणें हें आपलें कर्तव्य नाहीं असें म्हणणारा पुरुष इतोत्तर निघेल, असें आम्हांस तरी खास वाटत नाहीं. तात्पर्य, स्वराज्य प्राप्त करून घेणें हेंच राष्ट्रीय सभेचें मुख्य कर्तव्य किंवा उद्देश आहे, ही गोष्ट आतां निर्विवाद व बेमालूम सिद्ध झाली आहे. ''

राष्ट्रीय सभेचें साध्य कोणतें तें ठरलें; पण साधनें कोणतीं याबद्दलही कार्यकारी पुरुषांचे विचार निश्चित व स्थिर असावे लागतात असें याच अंकांत सांगून पुढील तीन मुख्य साधनें लोकमान्यांनीं लोकांपुढें मांडलीं:— " स्वराज्य आम्हांस साध्य आहे व स्वदेशी चळवळ, बहिष्कारयोग आणि राष्ट्रीय शिक्षण हीं स्वावलंबनाचीं सदर हेतू सिद्धीस नेण्यास तीन मोठीं साधनें आहेत. या साधनांचा योग्य उपयोग करून नव्या पिढीनें दादाभाई नवरोजी यांनीं सांगितल्याप्रमाणें कार्यसिद्धि करून घेतली पाहिजे. वर निर्दिष्ट केलेल्या साधनांचा उपयोग करून स्वराज्याचा हक्क मिळविण्यास झटलें पाहिजे, व अशा रीतीनें उद्योग केल्यास परमेश्वराच्या कृपेनें लवकरच इष्टसिद्धि झाल्याखेरीज राहणार नाहीं अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे. ''

वरील विवेचनावरून स्वराज्याविषयीं लो. टिळकांचें काय मत होतें, स्वराज्य कसें संपादन करितां येईल व तत्प्रीत्यर्थ टिळकांनीं आपल्या अनेक लेखांनीं, भाषणांनीं व इतर चळवळीनें कोणती विधायक कामगिरी केली याची कल्पना येईल.

राजकीय प्रकरणांतच समावेश होणारी लोकतर्फेची एक कामगिरी लो. टिळकांनीं १९०८ सालीं केली ती

**विभागणी कमिशनपुढील साक्ष**

ही होय. तिचा थोडक्यांत सारांश असा. राज्यसत्तेचें केंद्रीकरण (Centralization) झाल्यामुळें राज्यव्यवस्थेंत सुधारणा नीटपणें करतां येत नाहींत असें जें स्थानिक अधिकाऱ्यांचें म्हणणें आहे, अधिकारविभागणीवद्दलच्या ओरडीचें बीज त्यांतच असून लोकांना राज्यकारभारांत प्रत्यक्ष कांहीं अधिकार दिल्याशिवाय व सरकारी अधिकारी आणि लोकांचे पुढारी यांच्यांत पूर्वी होता तसा सल्ला, सलोखा असल्याशिवाय केवळ अधिकारविभागणीनें इष्ट कार्य घडून येणार नाहीं, असा लो. टिळकांनीं या साक्षींत चोख जबाब दिला. राजकीयदृष्टया ही साक्ष विशेष महत्वाची आहे.

**विलायतेला डेप्युटेशन.**

स्वराज्याची प्राप्ती होऊन आपलें राष्ट्र सर्व रीतीनें पाश्चात्य राष्ट्राच्या योग्यतेस चढावें असें लो. टिळक यांना अनेक वर्षें वाटत होतें; तत्प्रीत्यर्थ रात्रंदिवस त्यांचे भगिरथ यत्न चाललें होते; तसेंच तदनुरोधानें लोकमत तयार करण्याचे कित्येक मार्ग त्यांनीं अंगिकारिलें होते. हल्लींच्या राज्यव्यवस्थेचें धोरण बदलणें ही तर मुख्य अडचण. पण याशिवाय, इंग्लंडांतून व्हॉइसराय, गव्हर्नर वगैरेसारखे बडेबडे अंमलदार हिंदुस्थानांत येऊन प्रसंगविशेषीं जो अवरंगजेवी अंमल ते गाजवितात किंवा आंग्लशाहींतील चाललेल्या मोंगलाई धुमाकुळाकडे

जाणून बुजून दुर्लक्ष करितात, व कित्येक वेळां पार्लमेंट आणि स्टेट सेक्रेटरी यांसही धाब्यावर स्वस्थ बसवून हम करेसो कायद्यानें जो शिरजोरपणा चालवितात, ती अडचण प्रमुख असून ती नाहींशी व्हावी यावर टिळकांचा विशेष कटाक्ष असल्यामुळें हिंदुस्थानांत जशी राजकीय चळवळ सुरू ठेविली पाहिजे तशीच विलायतेतही हिंदुस्थानच्या वतीनें सारखी खटपट करणारें डेप्युटेशन अथवा कायमचें मिशन ठेऊन त्यांनीं तेथें चळवळ करावी असें त्यांनीं एक दोन प्रसंगीं म्हटलें होतें. त्याप्रमाणें लवकरच स्वराज्य पक्षातर्फे लो. टिळकांच्या धुरीणत्वाखालीं एक डेप्युटेशन इंग्लंडला गेलें. तेथें जें कांहीं थोडेबहुत कार्य झालें, त्यांत त्यांनीं मजूर पक्षाची बरीच सहानुभूती संपादली, हें विशेष होय. इंग्रज-जनतेला हिंदी लोकांची स्थिती व त्यांच्या आकांक्षा आणि स्वराज्याची पात्रता यांची योग्य माहिती अनेक भाषणें करून दिली. विलायतेंत त्यांचा हा उद्योग एकसारखा अहर्निश दोन चार महिने चालू होता. विलायतेहून परत पुण्यास आल्यावर पुणें म्युनिसिपालिटीनें लो. टिळकांना मानपत्र देऊन जो त्यांचा गौरव केला तो योग्य होता असेंच कोणीही कबूल करील.

## होमरूल संघ.

१९१४ सालच्या-महायुद्ध-झंझावातानें ब्रिटिश-साम्राज्य मनोरा हळू हळू एका बाजूला कलत चालला. तो जमीन दोस्त न होतां पूर्ववत् सरळ उभा रहावा म्हणून " ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं आपल्यावर आणिलेल्या अरिष्टांस मनीं न आणतां, ह्या उदार पुरुषानें १९१४ सालीं सुरू झालेल्या महायुद्धांत ब्रिटिश व दोस्त राष्ट्रें यांचांच पक्ष

न्यायाचा व सत्याचा आहे आणि त्यांत पूर्ण दिलानें मदत करणें हिंदुस्थानांतील रयतरईतांचें कर्तव्य आहे, असें खास आपल्या मराठा-केसरींत प्रसिद्धपणें जाहीर करण्यांत अनमान केलें नाहीं— अवधि लाविला नाहीं.....हिंदी व्हालंटिअर्समध्यें स्वपुत्रास दाखल केले. पूर्वीचा गैरसमज उत्पन्न करणारा संदिग्धार्थी 'स्वराज्य' शब्द टाकून त्या ऐवजीं 'होमरूल' हा शब्द, कीं ज्याचा अर्थ साम्राज्यांतर्गत स्वातंत्र्य पण समतेच्या तत्वाचें स्वातंत्र्य असा एकच होतो तो, स्वीकारून आपल्या पक्षाचा 'होमरूल संघ' निर्माण केला.... मॉंटेग्यूचेम्सफर्ड-घटित सुधारणा अल्प म्हणून धिक्कारून झुगारून द्याव्या व त्यापासून अलिप्त राहून बेजबाबदार दुराराध्यांचा पंथ देशांत माजवावा, हा कार्यक्रम अखेर निषिद्ध ठरवून टिळकांनीं त्या सुधारणा जितक्या अधिक प्रगामी होतील तितक्या करण्याचा यत्न करण्याचा राजमान्य मार्ग अंगिकारला. त्यासाठीं स्वतः व स्वतःच्या पक्षाचे धुरीण यांचें डेप्युटेशन यांस खास विलायतेस नेलें. नव्या कौन्सिलांत जावें व तेथें सनदशीर रीतीनें वागून होमरूल त्वरित मिळण्याची एक ध्येयानें खटपट करावी, असा कार्यक्रम त्यांच्या पक्षाचा त्यांनीं आपल्या हयातींत अगदीं रेखून दिला होता." *

महायुद्ध संपलें. १९१९ सालच्या पार्लमेंटांत इंडिया गव्हर्नमेंट ॲक्ट पसार झाला. तदनुरोधानें सन १९२१ पासून, नव्या तऱ्हेचें व नव्या स्वरूपाचें, सनदशीर चळवळीच्या तत्त्वानुसार चालणारें, असें अधिकारी वर्ग व प्रजाजन पक्ष ह्यांच्यामध्यें रण सुरू

* प्रि. पाध्येकृत लो. टिळक पान ३९

व्हावयाचें, त्या संग्रामांत पिम्, क्रामवेल, अथवा हँपडन् इत्यादि विख्यात ब्रिटिश मुत्सद्यांप्रमाणें नेतृनियंतृत्व घेण्यास योग्य असा आज मितीस जर कोणी हिंदी पुढारी अलौकिक बुद्धीचा व धडाडीचा होता तर ते कै. लो टिळकच होते. ह्या नव्या मनूंत आपल्या पक्षासंबंधीं व त्यांचीं मतें आणि कार्यक्रम पुनर्निर्णित करण्यासंबंधीं जी कामगिरी प. वा. टिळकांनीं केली ती सूज्ञतेची, चतुरतेची व देशहिताच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची झाली, ह्यांत संशय नाहीं.

लो. टिळकांच्या कामगिरीचा विधायकपणा, भरीवपणा व दूरदर्शीपणा आपणाला दिवसेंदिवस अधिक पटत चालला आहे. " ऑगष्ट १९२०, पांच वर्षापूर्वीचा तो काळ आणि येत्या ऑगस्ट महिन्यांतील काळ यांत राजकीय परिस्थितीच्या दृष्टीनें केवढें अंतर पडलें आहे. याचा शांतपणें विचार करितां लो. टिळकांचा मृत्यू म्हणजे देशावर कोसळलेले महान संकट ! आपल्या मृत्यूपूर्वी टिळकांनीं आपल्या पक्षाला जो प्रतियोगी सहकारितेचा मंत्र दिला आणि त्या मंत्राच्या द्वारें आपला राजकीय लढा कौन्सिलांवर बहिष्कार घालून लढविणें हें अदूरदर्शित्वाचें लक्षण आहे असें जें त्यांनीं सुचविलें त्याची सत्यता आज पांच वर्षांच्या कटु अनुभवानें त्या पक्षाच्या लोकांनां चांगलीच पटविली आहे. आपल्या राजकीय तत्त्वांनां व्यवहार्य स्वरूप देण्याच्या बाबतींत लो. टिळकांच्या हातून क्वचित व चूक होत असे, असें त्यांच्या एकंदर सार्वजनिक कार्यांवरून अनुमान काढल्यास तें चुकीचें ठरणार नाहीं. प्रत्यक्ष चळवळीचे वेळीं ते जहालांतील जहाल या बाण्यानें वागत. पण कोणतीहि गोष्ट व्यवहारांत उतरवितांना ( लोकहिताचे दृष्टीनें इष्ट असेल ती ) शक्य ती

तडजोड करण्यास ते तवढेच उद्युक्त असत. १९०६ सालीं कलकत्त्यास १९०७ सालीं सुरत येथें, किंवा १९१४ नंतरच्या होमरूलच्या चळवळींत अशी तडजोड करण्यास ते स्वतः तयार असल्याबद्दलचे पुष्कळ दाखले दाखविता येतील. " *

लो. टिळकांना अखिल जनतेच्या जागृतीबद्दल अहर्निश तळमळ वाटत असे. बहुजनसमाजामध्यें जोराची जागृती झाल्याशिवाय मुठभर सुशिक्षितांच्या सभांना आणि त्या सभांतून पसार झालेल्या ठरावांना सरकार व सरकारची नोकरशाही फारशी भीक घालणार नाहीं, हें टिळकांनीं अचूक ओळखून प्रथम महाराष्ट्रांत व नंतर अखिल देशांत प्रचंड चळवळ एकसारखी चालू ठेविली. निजलेल्या देशाला खडबडून जागें करण्याकरितां, महानिद्रेंतून हिंदभूमीच्या बालकांना कोणत्या उपायांनीं उठवून, एकदाचें स्वतःच्या पायावर उभें करून भोंवताली काय चाललें आहे तें पाहण्यास समर्थ करण्याकरितां लो. टिळकांनीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली, आपल्या परिश्रमाची शिकस्त केली. हें अत्यंत महत्त्वाचें देशकार्य आहे ही भावना नित्य डोळ्यापुढें असल्यामुळें, तें कार्य करीत असतांना त्यांनी कोणाचीहि व कशाचीहि पर्वा केली नाहीं. " साध्य व साधन यांचा योग्य मिलाफ करून, अनेकांच्या रोषास पात्र होऊन, संकटासी टक्कर देऊन अत्यंत धीरोदात्त वृत्तीनें त्यांनीं हें कार्य तडीस नेलें आणि या त्यांच्या विलक्षण धडाडींत, धैर्यांत, चिकाटींत, किंबहुना हटवादीपणांतच त्यांच्या थोरपणाचा विशेष आहे. जी गोष्ट एकदां

* मनोरंजन ऑगस्ट १९२५ पान १०९

स्वीकारिली, जें व्रत एकदां अंगिकारिलें, ज्या पक्षाला, ज्या व्यक्तीला एकदां आपलें म्हटलें तें व्रत, ती गोष्ट, तो पक्ष केंव्हांही सोडावयाचा नाहीं; असा त्यांचा बाणेदार स्वभाव होता. लो. टिळक यांच्या वेळीं जीं मतें, जे पक्ष जे राजकीय लढे ऐन रंगांत होते ते आतां बदलले आहेत, मिटले आहेत, किंवा पार नाहींसे झाले आहेत. राजकारण हा वादच असा आहे कीं त्याजमध्यें कालचे प्रसंग आज नाहींत, आजचे उद्यां नाहींत; म्हणूनच ‘ कालचा रॅडिकल तो उद्याचा टोरी ’ अशी म्हण इंग्रजींत रूढ झाली आहे.........हिंदी जनतेला प्रथम राजकीय गुलामगिरींतून मुक्त केलें पाहिजे त्याशिवाय तिचा तरणोपाय नाहीं अशी मनाची खात्री पटूनच त्यांनीं आपल्या चळवळींत सामाजिक सुधारणेला थारा दिला नाहीं........टिळकांना आपण थोर राष्ट्रीय विभूति म्हणून जो मान देतों तो त्यांच्या अकृत्रिम देशसेवेबद्दल होय. आपलें सर्वस्व देशकार्याला वाहिल्याशिवाय तें कार्य नीट मार्गाला लागणें शक्य नाहीं, हें वेळींच ओळखून आयुष्याच्या सुरवातीपासून अखेरपर्यंत जबरदस्त तडफेनें स्वतः पुढें आंखून ठेवलेल्या मार्गानें चालणें हें जें थोरपणाचें लक्षण तें लो. टिळकांत पूर्णपणें वसत होतें. हें लक्षण त्यांच्यांत आहे याची सत्यता जनतेला बिनतोड पटल्यामुळेंच ते लोकप्रिय—लोकमान्य झाले. ”*

श्रीयुत सीता—कान्त यांच्या विधानांतील किंचित् अतिशयोक्ती वजा केल्यास बराच तथ्यांश आहे. ते म्हणतात “ हिंदुस्थानांत दोनच स्वातंत्र्यवीर दिसतात. एक लो. टिळक आणि दुसरे म. गांधी

* मनोरंजन आगस्ट १९२५ पान १०९

......लोकमान्यांनीं ‘ स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तें मी मिळविणार ’ हें तत्त्व शिकविलें. म्हणजे स्वराज्य हेंच आणि हें एकच ध्येय लोकांपुढें ठेवून इतर दुय्यम व निराळ्या गोष्टी ह्या बुद्धिभेद करणाऱ्या व म्हणूनच त्यांनीं अगदीं उपेक्षणीय ठरविल्या लोकमान्यांनीं हिंदीं लोकमत व हिंदी राजकरण एकनिष्ठ व स्वराज्य-निष्ट बनविलें. ” *

पुढें पुढें जरी श्री. सीता—कान्तांच्या मताप्रमाणें लो. टिळकांनीं स्वराज्यविरहित इतर गोष्टी उपक्षणीय मानल्या असल्या तरी प्रथम चळवळीच्या वेळीं म्हणजे साधारण १८९६ ते १९०६ पर्यंत इतर गोष्टींकडे त्यांनीं फारसें दुर्लक्ष केल्याचें दिसून येत नाहीं. इतकेंच नाहीं तर कित्येक चळवळींत जोराचा पुढाकार घेतला. त्या चळवळींचा विशेष हा कीं त्या साधारणत: राष्ट्रीय नसून केवळ

**प्रांतिक**

होत्या, महाराष्ट्रापुरत्या होत्या. सामान्य-जनास जवळ करण्याच्या गोष्टी १८९६–९७ सालीं येऊन पडलेल्या प्लेग व दुष्काळ ह्या महदापदांच्या समयीं त्यांनीं केल्या. त्यावेळच्या प्लेगाचा प्रताप प्रखर होता आणि प्लेगच्या बाबतींत महाराष्ट्राचा तो प्रथम अनुभव होता. केवळ ताप येऊन तीन दिवसांत मनुष्य जातो हें ऐकूनच अनेकांचें धाबेंच दणाणें. बरें, एखादा दुसरा जातो म्हणावें तर तसें नाहीं, चढतां चढतां सात दिवसाच्या आंत शंभरावर आंकडा चढला तो

* करमणूक दिवाळी अंक १९२५ पान ९३

लवकर उतरेना. तापाच्या केवळ संशयानें कित्येक तात्काळ या प्लेगास बळी पडत. सरकारनें योजलेल्या उपायांनीं प्लेगाचा भर तर कमी झाला नाहींच, उलट प्लेगाचा आणि सरकारचा जुलूम यांचा कांहीं महिनें महाराष्ट्रांत धुमाकूळ चालला. वास्तविक प्लेगापेक्षां अधिकाऱ्यांचा जुलूमच लोकांना अधिक जाणवला. लो. टिळकांनीं सरकारच्या सोल्जरांकडून होणाऱ्या तपासांचा व जबरीनें रोगग्रस्तांस कुटुंबांतून दूर ओढून नेण्याच्या कृतीचा निषेध केला. सरकारी इस्पितळांतही नीट सोय होत नाहीं असा बराच गवगवा झाल्यावरून, लो. टिळकांनीं अनेक डॉक्टर, व श्रीमंत लोकांच्या मदतीनें

**हिंदु इस्पितळ**

उघडविलें. " स्वत: टिळकांच्या दिवसांतून एकदोन खेपा तरी या इस्पितळाकडे होत. तपासणी पार्टीबरोबर ते स्वत: कधीं फारसे हिंडावयास गेले नाहींत; परंतु रँडसाहेब किंवा प्लेग कमेटीकडे लोकांच्या तक्रारी घेऊन जाणें व त्यांची दाद लावणें, याकरितां एकदोन दिवसांनीं प्लेग कचेरीकडे त्यांच्या खेपा होतच असत. " * तसेंच " एप्रिलच्या प्रारंभी रा. ब. विठ्ठल नारायण फाटक, डॉ. गर्दे, बापू पुरुषोत्तम जोशी, स्वत: टिळक वगैरेंच्या सह्यांनीं प्लेग कमेटीकडे एक रीतसर तक्रार अर्ज करण्यांत आला. त्यांत लोकांवर जुलूम न होतां उपाय योजना चांगली कशी होऊं शकेल याचें सविस्तर वर्णन दिलें होतें. ........ पण रँडसाहेबांच्या डोक्यांत पुण्याच्या लोकांबद्दल दूषित पूर्वग्रहानें ठाणें दिलेलें, यामुळें त्यांनीं कोणतीच गोष्ट मनावर

* केळकरकृत लो. टिळक चरित्र पृष्ठ ५१९

घेतली नाहीं. मार्चच्या प्रारंभीं टिळकांनीं एक स्वतंत्र ' मेमोरँडम् ' लिहून गव्हर्नरसाहेबांकडे पाठविला होता; व त्यांनीं तो तसाच रँड साहेबांकडे पाठवून दिला. पण टिळकांना बोलावून घेऊन त्यांनीं कधीं, असें नाहीं असें, याची चर्चाहि केली नाहीं. एप्रिल अखेर रोग पुष्कळच हटला." * असो. प्लेगचा जाच बराच झाला, जुलूम बेहद्द झाला व शेवटीं सगळ्याचा परिणाम भयंकर झाला. हें सर्व वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे. पण येथें एवढेंच दाखवावयाचें आहे कीं, कार्य करण्यास टिळकांची मनांतून अति कळकळ असे, व तडफही पण असे. " स्वत: गांवाबाहेर जाऊन राहिलेल्या सुधारक पक्षाच्या लोकांनीं मेळेवाल्यांना प्लेगचे निमित्त करून उगाच टाकून लिहिलें, त्याला टिळकांनीं तिखट उत्तर दिलें, तें योग्यच होतें, परंतु टिळकांची टीका काय नुसतीं विध्वंसक असावयाची, अमूक असें करा अशी विधायक दिशा ते दाखवीत नसत, असें म्हणणारांना या प्लेगच्या बाबतींत तरी टिळकांनीं नुसतां उपदेश करूनच नव्हे तर स्वत: धडाडीनें पुढें होऊन व कृति करून जें उत्तर दिलें तें खरोखर अधिक समर्पक होतें. तुलनाच केली तर या प्रसंगीं त्यांच्या प्रतिपक्षीयांहून अधिक विधायक कामगिरी टिळकांनीं केली हें कोणाही नि:पक्षपाती मनुष्याला कबूल करावें लागेल." प्रि. पाध्ये लिहितात " फार काय, सांथीचे रोगास न भितां स्वयंसेवकामध्यें स्वत: हिंडून प्लेगनें लागलेल्या लोकांजवळ राहून त्यांची शुश्रूषा करण्यास ते डगमगले नाहींत."

* केळकरकृत लो. टिळकचरित्र पान ५३३

महाराष्ट्र दुष्काळ-दुर्दैवानें अनेक वेळां दीन झाला आहे, होरपळला आहे. पण

## १८९६ सालच्या दुष्काळानें

तो बेफाम भाजला असें सांगतात. धारण विलक्षण कडकली, दीन-गरीब लोकांच्या पोटाला उपासमारीचे तीव्र चिमटे बसूं लागले. अन्नपाण्यावांचून कित्येकांनीं तडफडून जीव सोडले. चालत्या बोलत्या प्राण्यांची ही अवस्था. गुराढोरांची प्राणहानि बेसुमार झाली. ' दुर्मुख ' हें संवत्सर आपलें नांव खरें करितें कीं काय अशी जबरदस्त भीति जनतेला वाटली. " दुष्काळामुळें प्राणहानि होत असतां, सरकार या फॅमिन-कोडाचा उपयोग जरूर तितक्या तत्परतेनें किंवा सढळपणानें करीत नव्हतें. सरकारच्या या हलगर्जीपणामुळें दुष्काळासंबंधीं राजकीय चळवळ करणें अवश्य झालें; टिळकांनीं ती विशेष नेटानें केली......ता. २० आक्टोबरच्या अंकापासून फॅमिन-कोडाचा आधार घेऊन, लोकांनीं आपल्या हक्कास जागृत राहून दुष्काळ निवारण्याचे उपाय सरकारकडून करवून घेतले पाहिजेत अशी शिकवण देण्यास केसरीनें सुरवात केली होती. दुसऱ्या पक्षीं धान्याच्या लुटी थांबविणें, परोपकारार्थ स्वस्त धान्याचीं दुकानें काढणें वगैरे गोष्टी करून लोकांना सरकारास आपणाकडून थोडी मदत करितां येण्यासारखी असते ती त्यांनीं करावी असाहि

## विधायक उपदेश

केसरीनें केला होता. दुष्काळाचा फायदा घेऊन गबर होणाऱ्या व्यापाऱ्यांनाहि केसरीनें झणझणीत इषारा दिला होता. आमच्या हातून

होईल तें आम्ही करूंच; पण सरकारच्या हातीं आहे तें सरकारच्या हातून करविण्याचीहि दक्षता आम्हांलाच घेतली पाहिजे. असा दुहजबी उपदेश लोकांना केसरीनें सुरू केला होता." ह्याच वेळीं सार्वजनिक सभा पण टिळकांच्या हातांत आलेली होती.(Decentralization of provincial Finance) मुख्य व प्रांतिक सरकारच्या पैशाची वांटणी, या विषयावर सभेच्या त्रैमासिकांत निनांवीं लेख लिहून रानडे यांच्या लेखमालेचा सांधा जसा टिळकांनीं बेमालूम जोडला, तसाच दुष्काळी चळवळ सभेकडून आपण मागें राहून करविण्यांतही टिळकांनीं रानडे यांचेच उदाहरण गिरविलें. रानडे सरकारी नोकरींत असले तरी राजकारणांत पडणाऱ्या तरुण पिढीला गुरूच्या नात्यानें धडे पाठ देण्याची पात्रता माधवरावजींमध्यें होतीं हें टिळक नेहमीं बोलून दाखवीत; व कांहीं बाबतींत त्यांचें उघड अनुकरण करून शिष्य या स्तुतीचा करभारही देत. १८७६–७७ च्या दुष्काळाचे वेळीं रानड्यांनीं सार्वजनिक सभेकडून महाराष्ट्रांत फिरते एजंट पाठवून दुष्काळासंबंधीं खरी व अस्सल माहिती आणविण्याचा प्रघात सुरू केला होता. सभेच्या त्रैमासिकांतून या एजंटांनीं आणलेल्या हकीगतीवरून ( Famine Narratives ) "दुष्काळी कहाण्या" या नांवाखालीं रिपोर्ट प्रसिद्ध होत व त्यांचे आधारावर रचलेले विधायक सूचनांचे अर्ज सभेकडून सरकारकडे रवाना होत. या कहाण्या व अर्ज यांचा सरकारनें तेव्हां योग्य परामर्ष घेऊन मधून मधून सभेचे आभारहि मानले होते. मग आंताहि तसेंच कां होऊं नये? तीच सभा, तसलीच दुष्काळाची परिस्थिति, तीच शोधकबुद्धि व त्या वेळेप्रमाणें आजहि परिस्थित्यनुरूप

## विधायक अशाच शिफारसी

मग सरकार सभेचे कदाचित् आभार न मानो, परंतु चलनशील होऊन सभेच्या अर्जांना सरळ सरळ उत्तरें तरी देईल.......सभेचे नांव व अर्जपद्धति तीच, परंतु चालक माणसें ही तर बदललींच, सभेची आणि शिवाय सरकारच्या समजुतीप्रमाणें सभेचे हेतुहि बदललेले, मग जुना दाखला उपयोगी कसा पडणार ?

" ता. ८ नोव्हेंबर रोजीं सभेनें सरकारकडे एक सविस्तर अर्ज पाठविला. हा अर्ज चेअरमन अण्णासाहेब पटवर्धन व चिटणीस शिवरामपंत परांजपे आणि जालनापूरकर यांचे सहीनें गेला होता. परंतु तो बहुतांशी टिळकांनींच तयार केला होता. त्यांत सोलापूर, विजापूर, नगर या जिल्ह्यांतील सविस्तर हकीगत दिलेली होती. पाण्यावैरणीची नुसती टंचाई नसून खराखुराच दुष्काळ पडलेला आहे, व सरकारनें कोणतीहि औपचारिक सबब न मानतां, हिंदुस्थानचे लोक दरसाल दीड कोटी रुपये दुष्काळाचा विमा उतरण्यादाखल देत असतात हें लक्षांत ठेऊन, तावडतोब दुष्काळ जाहीर करून योग्य त्या उपायांचा अवलंब करावा असें त्यांत लिहिलें होतें....१८९७ च्या जानेवारी-एप्रिल या जोडअंकांत टिळकांनीं फॅमिन–कोडावर स्वतंत्र निनांवी लेख लिहिला होता व त्यांतील अनेक दोष दाखविले होते. फॅमिन–कोडाची दुरुस्ती सरकारकडून व्हावयाचीच होती, व त्या दृष्टीनें सरकारपुढें लोकमत मांडण्याकरितां म्हणून हा लेख मुद्दाम लिहिण्यांत आला होता. " *

* केळकरकृत लो. टिळक चरित्र पृष्ठ ५०३

पण इतके करूनच टिळक थांबले असें नाहीं. फॅमिन–वर्क्स मध्यें विणकर लोकांना खडी फोडणें, रस्ता खोदणें वगैरे कामें न सांगतां त्यांच्या धंद्याला योग्य असे घर बसले धंदे द्यावेत असें टिळकांनीं सरकारास सुचविलें. आणि सार्वजनिक सभेनें आपले प्रतिनिधी म्हणून सोलापुरास पाठविलें असतां टिळकांनीं तेथें एक कमेटी स्थापन केली व तिच्यातर्फे सरकारशीं पत्रव्यवहार सुरू केला. थोडक्यांत कमेटीची योजना अशी होती कीं, पांचशेंपासून हजार विणकर लोकांच्या कुटुंबाना दुष्काळापुरतें काम देऊन सहा महिने पोसावे अशा रीतीनें सरकारनें ह्याच नमुन्यावर मोठा प्रयत्न कसा करावा याचें जनतेनें उदाहरण घालून दिलें होतें. पण तसा प्रयत्न सरकारकडून झाल्याचें दिसून येत नाहीं. मग कदाचित् जनतेच्या उदाहरणाचें अनुकरण करण्यांत सरकारास कमीपणा वाटत असल्यास न कळे.

सार्वजनिक सभेकडून टिळकांनीं आणखी एक विशेष महत्त्वाची गोष्ट केली ती म्हणजे फॅमीन–कोडचा फुकट प्रसार. खरें पाहिलें असतां फॅमिन–कोडाची मराठी आवृत्ति काढून फुकट नव्हे पण विकत तरी प्रसार करण्याचें सरकारचें काम होतें. परंतु खुद्द इंग्रजी प्रत मिळण्याची मारामार, मग मराठीचें नांवच नको. " हें जाणून टिळकांनीं सार्वजनिक सभेकरितां एक लहानसें पुस्तक मराठींत तयार केलें. त्यांत फॅमिन–कोडाचा सारांश, निवडुंगापासून वैरण करण्याची कृति, दुष्काळ व्यवस्थेसंबंधीं सरकारनें काढलेल्या ठरावांचा सारांश, दुष्काळीं जिल्ह्यांत काढलेल्या सरकारी कामाची माहिती, सरकारी नोकरांना दुष्काळांत ज्या सवलती मिळाव्या त्यांची माहिती, तगाई कायद्याखालचे नियम, इत्यादि मजकूर होता. या पुस्तकाच्या सहा

हजार प्रती सार्वजनिक सभेनें छापविल्या. प्रत्येक मराठी जिल्ह्याच्या कलेक्टराकडे शंभर प्रति फुकट वांटण्याकरितां दिल्या ............ परंतु सरकार सभेच्या बारशास जेवलेलें ! हें पुस्तक दुष्काळासंबंधाचे असलें तरी खाजगी आहे, म्हणून तें आम्हीं वाटूं इच्छित नाहीं. असें सरकारनें सभेला कळविलें. ''

सूज्ञ मनुष्यानें दिशा दाखवून दिल्यावर शहाणे लोक त्या दिशेनें अचूक जातात. म्हणूनच व्यक्तिशः टिळकांच्या प्रेरणेनें गांवो-गांवीं सभा भरवून सरकारकडे अर्ज पाठविण्याचें काम सुरू झालें होतें. '' ना. खरे यांच्यासारखे न हालणारे मुंबईचे हायकोर्ट वकील देखील तालुक्यांच्या गांवाला जाऊन, कातकरी लोकांना सरकारकडून मदत कोणती मगावी याविषयीं उपदेश करूं लागले होते. ''

थोडक्यांत या चळवळींत विध्वंसक टीकेबरोबरच विधायक कामगिरीहि टिळकांचे हातून बरीच झाली......अधिक फळाला आलेली कामगिरी म्हटली म्हणजे पुणें शहरांत त्यांनीं स्वस्त धान्याचीं दुकानें मांडविलीं ही होय. बेकार लोकांनीं धान्याचीं दुकानें लुट-ल्याची माहिती प्रसिद्ध होई ती केसरींत अर्थात् देत. परंतु ती केवळ लोभी व्यापाऱ्यांना आपल्या कर्तव्याचा उमज पडावा व तें त्यांचे-कडून न झाल्यास कोठून कसा गोता येईल हें त्यांच्या पुरें लक्षांत यावें म्हणून पण बाजारलूट होणें हें अनिष्ट व अश्लाघ्य असें तें प्रति-पादित, इतकेंच नव्हे तर असल्या उपद्रवी लोकाचे हल्ले इतर लोकांनीं जुटीनें परतवावें असाच त्यांचा उपदेश असे. व्यापाऱ्यांच्याही पोटांत शिरून धंद्यांत इतर रीतीनें श्रीमंताकडून नफा मिळविला तरी

धर्मादाय म्हणून कां होईना पण स्वस्त धान्याचीं दुकानें काढावीं, यांकरितां टिळकांनीं पुष्कळ प्रयत्न केला. राजकीय चळवळीला झालें तरी लोकोपयोगाचें अधिष्ठान असल्यावांचून भागत नाहीं हें नेहमीं टिळकांच्या लक्षांत असे. " *

लो. टिळक यांनीं १९०८ सालीं लोकांतर्फे ज्या प्रांतिक कामगिऱ्या केल्या त्यांत

## पुणें जिल्हा परिषद्

हीं एक फार महत्त्वाची आहे. राष्ट्रीयसभा अधिक कार्यकरी होण्यास प्रांतिक सभा तालुका सभा यांत जोम येऊन त्यांच्या द्वारें लोकमतास योग्य दिशा दाखविली पाहिजे असें टिळक यांचें ठाम मत होतें. म्हणून यावर्षी सार्वजनिक सभेमार्फत पुण्यास जिल्हा सभेची स्थापना करून आपल्या गरजा, इच्छा व अडचणी काय आहेत आणि आपली सुधारणा कशी केली पाहिजे यांचा उहापोह केला. शिवाय सुरतेची राष्ट्रीय सभा मोडल्यानें राष्ट्रांतील लोकांच्या महत्वाकांक्षेस एक प्रकारें विलक्षण जबर धक्का बसून राष्ट्रीय व नेमस्त पक्षांच्या लोकांत दुही माजून दोघांची तोंडें दोन दिशेस जीं झालीं होतीं, तीं एका दिशेस कोणत्या उपायानें करितां येतील, असा विधायक विचारही टिळक यांनीं सभा भरवितेवेळीं केला होता; आणि तेवढ्याचकरितां रा. ब. जोशी यांच्या सारख्या विद्वान्, अनुभवी व पोक्त मनुष्याची अध्यक्षांचें जागीं खास योजना करून दोहोंपक्षांच्या लोकांच्या तंत्रानें हें जिल्हा परिषदेचें

* केळकरकृत लो. टिळक चरित्र पान ५१७

काम त्यांनीं नीटपणें तडीस नेलें. या जिल्हापरिषदेंत त्यांनीं राष्ट्रीय-शिक्षण, मद्यपाननिषेध, जमिनमहसूल, जंगल, हत्यारांचे परवाने, वगैरे विषयांवर भाषणें केली. एकंदरित दोन विरुद्ध मतांच्या लोकांचा समेट घडवून आणण्याचा प्रयत्न टिळकांनीं केला तो विधायक स्वरूपाचा नाहीं काय ?

झाडेंझुडुपें, निवडुंग, कांटे वगैरेनीं भरलेल्या जागेंत आपणांला इमारत बांधावयाची झाल्यास आपण प्रथम झाडेंझुडुपें, निवडुंग कांट्याचा पूर्ण कांटा काढतो, जमीन साफ करितो व मग छानदार इमारत उभारतो. तद्वत् मद्यपान हा लोकांच्या शारिराची, मनाची व मानाची व वित्ताची भयंकर हानी करणारा तीक्ष्ण कांटा आहे त्याचा विध्वंस केल्याशिवाय विधायक कामगिरी अपुरीच राहणार. म्हणून टिळकांनीं

## मद्यपाननिषेधाची जोराची चळवळ

पुण्यांत सुरू केली. अपकारी—खत्याचें उत्पन्न वाढविण्याचे हेतूनें सरकार मद्यपानास उत्तेजन देते. कंत्राटदारांची कड घेऊन भर लोकवस्तींत दारूचीं दुकानें घालण्यास सरकार परवानगी देते. ही गोष्ट गैर आहे. असें कित्येक दिवस टिळकांना वाटत होतें; व म्हणून मजूरवर्गांत व न्हावी, कोष्टी, तेली, तांबोळी वगैरे खालच्या दर्जाच्या लोकांत वेळीं अवेळीं मद्यपाननिषेधावर व्याख्यानें देऊन दारूपासून त्यांचीं मनें वळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला होता. प्रत्यक्ष काम करणाऱ्या लोकांच्या मदतीनें त्यांनीं ही चळवळ १९०८ च्या एप्रिल महिन्यांत धडाडीनें सुरूं केली. “ १९०७ च्या जुलै महिन्यांत पुणें

येथें ना. गोखले यांच्या अध्यक्षतेखालीं एक ' टेंपरन्स असोशिएशन ' स्थापन झाली असून तिच्या म्यानेजिंग कमिटीचे टिळक हे एक सभासद होते. पण नुसते कागदी घोडे नाचविल्यानें ह्या मंडळीच्या कामास यावा तितका जोर येणार नाहीं; असें टिळक यांस वाटून स्वत: अंग मेहनत करून या चळवळीस उत्तेजन देणारी स्वयंसेवक मंडळी निवडून काढली; व त्यांच्या कामासंबंधीं नियम ठरवून त्यांच्यामार्फत दारूगुत्त्याजवळ पिकेटिंग उर्फ पाहारा करण्याचें काम सुरू केलें; व कोणावर सक्ति किंवा जुलूम न करितां उपदेशानें व विनंतिविनवणीनें लोकांचीं मनें दारूपासून परावृत करण्याविषयीं त्यांना सल्ला दिला. या चळवळीस रा. रा. ल. रा. पांगारकर (मुमुक्षुकर्ते) न. चिं. केळकर, शं. ग. लवाटे, ल. र. गोखले वकील, भावे, देशपांडे, पारनाईक वगैरे सुशिक्षित लोकांचें चांगलें पाठबळ मिळाल्यामुळें पुण्याच्या बऱ्याच गुत्यांवरील दारुची विक्रि आठ पंधरा दिवसांत अगदीं कमी होऊं लागली, व जिकडे तिकडे या गोष्टींचा गवगवा होऊन या चळवळीकडे लोकांचें व सरकारचें लक्ष वेधलें. "*

## औद्योगिक

स्वराज्याला पोषक व देशाला हितकारक अशी आणखी एक महत्त्वाची कामगिरी लो. टिळकांनीं केली त्यावरून त्यांचा दूरदर्शीपणा दिसून येतो. तें कार्य

## स्वदेशी चळवळ

हें होय. " स्वदेशी हा स्वराज्याचा पाया होय " या एका वाक्यावरून स्वदेशीला लो. टिळक किती महत्त्व देत होते, हें दिसून येईल.

* लो. टिळकांची गेलीं ८ वर्षें पान ११२

प्रारंभी जेव्हां ही चळवळ सुरू झाली तेव्हां परदेशी जिन्नस वापरल्यानें आपल्या राष्ट्रांतील संपत्ती बाहेर जाते, त्यामुळें आपले उद्योगधंदे बुडतात; म्हणून देशी माल वापरून आपल्या उद्योगधंद्यास उत्तेजन द्यावें—म्हणजे सांपत्तिक दृष्टीनें आपली जी हानी होत आहे ती दूर करावी—एवढाच तिचा हेतु होता. पण वंगभंगामुळें म्हणजे १९०५ सालीं स्वदेशी चळवळीला निराळें स्वरूप आलें. सर्व हिंदुस्थानभर तिचा जोरानें प्रसार झाला. स्वदेशी उद्योगधंद्यास उत्तेजन देणें हा तर या चळवळीचा हेतु आहेच; परंतु 'नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं.' याप्रमाणें विलायतेंतील व्यापाऱ्यांच्या लठ्ठ खिश्यास चट्टा बसल्याशिवाय आमच्या राजकीय गाऱ्हाण्यांकडे सरकार फारसें लक्ष देणार नाहीं, असा आमच्या लोकांचा समज झाल्यामुळें त्यांनीं विलायती मालावर बहिष्कार घालण्याचा प्रयत्न चालविला आहे. स्वदेशी चळवळी संबंधीं विचार करतांना बहिष्काराचा राजकीय व सांपत्तिक अशा दोन्हीं दृष्टीनें विचार केला पाहिजे असें टिळक: यांचें मत होतें. प्रसंग पडला तर जपान, चीन, जर्मनी, अमेरिका वगैरे राष्ट्रांचा माल घेऊं इग्लंडचा घेणार नाहीं, असा लोकांनीं पक्का निश्चय करून या चळवळीचें राजकीय स्वरूप कायम ठेविलें पाहिजे, असें टिळकांचें सांगणें होते. बहिष्कार हा कायदेशीर उपाय असून आजपर्यंत त्याचाअनेक राष्ट्रांनीं उपयोग करून घेतला आहे. हें शस्त्र कायदेशीर व फायदेशीर असल्यामुळें तें उचलण्याचें कामीं हिंदुस्थानांत रंकापासून रावापर्यंत सर्वांची एकजूट होईल. त्यानें राजकर्त्यांच्या डोळ्यावरील पटल दूर होऊन आपणांस राजकीय हक्क जिंकतां येतील आणीबाणीच्या अनेक प्रसंगाचा पूर्ण फायदा घेऊन लोकाग्रणींनीं

लोकांना या शास्त्राचा उपयोग करण्यास शिकविलें पाहिजे, असा टिळकांचा उपदेश होता.

" अहमदाबाद येथील खालावत चाललेल्या काड्यांच्या पेटीच्या कारखान्यास चलन देऊन तो धंदा शिकविण्याकारितां पदरच्या पैशानें कांहीं विद्यार्थी निरनिराळ्या कारखान्यांत पाठवून, उद्योगधंद्याच्या अभिवृद्धीस्तव

**' पैसाफंड '**

म्हणून जो एक फंड जमत आहे तो जमविण्याचें कामीं एका लायक इसमाचा खर्च स्वतः कांहीं दिवस चालवून, देशी मालास उत्तेजन मिळावें म्हणून त्याचा बाजार अथवा प्रदर्शनें भरवून, घाऊक किंमतीनें व मुबलक माल लोकांना मिळावा म्हणून त्याचा प्रसार करण्याचे हेतूनें मुंबईस

**' स्वदेशी स्टोअर्स '**

या नांवाची संस्था स्थापन करून ( त्यांनतर स्व. स्टोअर्सच्या शाखा पुणें, सोलापूर, नाशीक वगैरे शहरीं निघाल्या ) व रसापासून एकदम गूळ व साखर कशी तयार होते, हें प्रत्यक्ष लोकांस दाखविण्याच्या हेतूनें स्वतःत्यासंबधीं यंत्रें आणवून त्यांनीं बोलण्याप्रमाणें होईल तितकें वागण्याचें अथवा नैतिक आचरणाचें जें उदाहरण घालून दिलें आहे तें राष्ट्रीय प्रगतीस खरोखर अत्यंत हितावह आहे. लोकांचा विश्वास बसून त्यांच्यांत कर्तव्यजागृती उत्पन्न होण्यास ज्या कित्येक गोष्टी कारणीभूत होत असतात त्यांत पुढाऱ्यांचें हें नैतिक वर्तनच पुष्कळ अंशीं कारणीभूत होतें, ही गोष्ट कोणासही नाकारतां यावयाची नाहीं. "*

* केळकरकृत लो. टिळक चरित्र पृष्ठ ४७१

अशा तऱ्हेनें राजकीय प्रगती करण्याविषयींचें टिळकांचें धुरिणत्व तर कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. राज्यव्यवस्थेचें धोरण सामान्य लोकांना माहीत नसल्यामुळें त्यांनीं तें आपल्या प्रयत्नानें व आचरणानें सर्व साधारण लोकांस समजावून दिलें होतें; हें सार्वजनिक सभेमार्फत लोकांना दुष्काळ कोडाचें रहस्य समजावून देणें, स्वदेशी चळवळीचे वेळीं मुंबई गिरणीवाल्यांच्या भेटी घेऊन मालाच्या फाजील किंमती न चढविण्यासाठीं त्यांना विनंती करणें, लोकांना घाऊक व खरा माल मिळावा म्हणून 'स्वदेशी स्टोअर्स' स्थापन करणें, जागजागीं व्याख्यानें देऊन उद्योगधंद्याकडे व बहिष्कार-योगाकडे लोकांना उद्युक्त करणें, व राजद्रोहाच्या कायद्याचें तत्त्व समजावून देऊन आपणावर प्रसंग बेतला असतां तो निभावून नेऊन लोकांना पुढें पाऊल टाकण्याविषयीं धडा घालून देणें, इत्यादि गोष्टींवरून चांगलें कळून येईल.

सन १८८० ते १९०८ पर्यंत लो. टिळकांनीं किती अचाट कामगिरी केली, त्यांचा विधायक कार्यक्रम कसकसा भरीव बनत गेला, विशाल झाला, लोकमान्य झाला, याची प्रचिती म्हणजे राजद्रोहाच्या खटल्यानंतर जे भरतखंडांतून व कित्येक परदेशी वर्तमानपत्रांत लेख आले त्यावरून दिसून येईल.

काळकर्ते शिवराम महादेव परांजपे लिहितातः—

"लो. टिळक ही कांहीं सामान्य व्यक्ति नाहीं. हें सरकारनें लक्षांत ठेवावयास पाहिजे होतें. ही आमच्या राष्ट्राचीं विभूति आहे, आमच्या

चळवळींचें उगम स्थान आहे, आमच्या धर्माचें मूळ कारण आहे. ही व्यक्ति स्वदेशीचा जन्म आहे, बहिष्काराचा जनक आहे आणि राष्ट्रीय शिक्षणाचा पालक आहे. आम्हां हिंदुस्थानांतील सर्व लोकांची ही व्यक्ति बुद्धि आहे, वैभव आहे आणि लौकिक आहे. ही व्यक्ति आमच्या आशेचा सूर्य आहे, निराशेचा काळ आहे. आम्ही आपल्या भावी उत्कर्षाचें प्रतिबिंब या व्यक्तीच्या आदर्शामध्यें पहात असतों; ही व्यक्ति आमच्या

## हिंदुस्थानाचा अलंकार

आहे......हिंदुस्थाना ! महाराष्ट्रा ! आतां तुझें पुढें काय होणार ? अथवा तूं काय कर्तव्य बजावणार ? "

लो. टिळकांच्या विधायक कामगिरीचें याहीपेक्षां अधिक उदात्त स्वरूप पहावयाचें असल्यास, हा पहा 'मुमुक्षु' चा उत्कृष्ट उतारा.

" टिळकांसारखा राजकीय तपस्वी उभ्या हिंदुस्थानांत दुसरा कोणी नाहीं. टिळकांचा हरिश्चंद्राच्या तोलाचा सत्वधीरपणा, टिळकांची दगडाचें पाणी करून टाकणारी विलक्षण चिकाटी, टिळकांचा अद्भूत दृढनिश्चय आणि अनन्यसाधारण धैर्य, टिळकांचा प्रांजळ, परोपकारी, निष्कपट, निर्मळ स्वभाव, आणि राष्ट्राची अव्यभिचारिणी भक्ति इत्यादि दिव्य गुणांचा विचार मनांत आला म्हणजे भरतभूमीच्या उद्धारार्थ परमेश्वरानें पाठविलेला हा एक महापुरुष आहे असें वाटतें."

१९१८ च्या या राजद्रोहाच्या खटल्यांतसुद्धां टिळकांनीं राष्ट्राची अनेक दृष्टीनें मोठी कामगिरी केली.

अँग्लो-इंडियन पत्रें हिंदी लोकांची प्रसंग विशेषीं कशी व किती नालस्ती, दिशाभूल, वस्तुस्थितीचा विपर्यास करतात, हें भर कोर्टांत अनेक दाखले देऊन मुद्देसूद रीतीनें त्यांनीं सिद्ध केलें. मुद्रण स्वातंत्र्याचें रक्षण हिंदुस्थानांत कशा तऱ्हेनें केलें पाहिजे हेंहि निस्पृहपणें त्यांनीं सांगितलें. हा खटला राजकीय होता. त्यांत चालू राजकीय चळवळीचा निकट संबंध असल्यामुळें हिंदुस्थानची राज्यव्यवस्था कोणत्या प्रकारानें चालली आहे, त्यांत काय दोष दिसतात, व ते कोणत्या रीतीनें सुधारले पाहिजेत, याचें त्यांनीं उद्‌घाटण स्पष्टीकरण करणें अगत्य होतें आणि एका वजनदार पत्राचे संपादक व लोकांचे पुढारी या नात्यानें हें कर्तव्य त्यांनीं अत्यंत चोखपणें बजाविलें, असें म्हटलें पाहिजे.

'बोले तैसा चालें, त्याची वंदावी पाऊलें' या तुकाराम महाराजांच्या अभंगाप्रमाणें, टिळक यांची राजकीय मतें ज्या प्रकारचीं आहेत त्यांस अनुसरूनच त्यांची वागणूक होती. सरकारच्या राज्यपद्धतीचे जे मार्ग त्यांना पसंत नव्हते व ज्या विरुद्ध ते नेहमीं लेख लिहीत असत, नित्य चळवळी चालू असत, त्यासंबंधानें स्वत:ची वागणूक ठेवण्याचा प्रसंग आल्यास ते बोलण्याप्रमाणेंच चालत; एवढेंच नव्हे तर, बोलण्यापेक्षां कृतींत त्यांचा जास्त जलालपणा, तिखटपणा दिसून येई; व या करारी बाण्यामुळेंच आजपर्यंत अनेक संकटें त्यांच्यावर कोसळलीं. प्लेगसंबंधीं जुलमी व्यवस्था, सारावसुलीची सक्ती,

हिंदुमुसुलमानांचें दंगे, गणेशोत्सव, शिवाजी उत्सव, स्वदेशी चळवळ, इत्यादि कित्येक प्रसंगीं सरकार व लोकपक्ष यांच्या मतांची झुंज लागली असतां, व त्यांत पुढारी या नात्यानें लोकमताप्रमाणें वागण्याचा प्रसंग आला असतां अनेक समयीं निर्भयपणें, निर्भीडपणें व निक्षून सरकारास जाब दिला असून त्याप्रमाणेंच त्यांनीं वर्तन ठेविलें होतें; व त्याबद्दल सरकारच्या तीव्र रोषाची किंचित्पण पर्वा केली नाहीं, हें त्यांच्यावरील दोन्हीं वेळच्या राजद्रोहाच्या खटल्यावरून सहज सिद्ध होणार आहे. उलटपक्षीं लोकमत जागृत करण्याकरितां वर्तमानपत्रद्वारेंच नव्हे तर संभाषण, वादविवाद, भेटी, सल्लामसलत, सभा इत्यादिकांच्या द्वारें कोणाची भीड न ठेवतां, बिनदिक्कत आपणांस योग्य वाटतें त्याच मार्गाचें त्यांनीं अवलंबन केलें.

लो. टिळकांनीं अनेक वेळां स्थानिकसंस्था, कांग्रेसचे पुढारी, किंवा खास राष्ट्रीय सभा यांजवरहि कित्येक प्रहार केल्यामुळें त्यांना चांगलें असें कशांतच दिसत नाहीं; विधायक धोरणापेक्षां विघातक धोरणाकडे त्यांचा जास्त कल आहे, व जातील तेथें व हातीं घेतील ती संस्था रसातळाला पोंचवून तिचा विध्वंस केल्यावांचून कधींहि राहणार नाहींत. असले भलभलते, वृथा आरोप विरुद्धपक्षाच्या पत्रांनीं त्यांच्यावर आजपर्यंत अनेक वेळां केले आहेत. पण या आरोपांत सत्यांशापेक्षां समाजप्रगतीचा, टिळकांच्या विधायक कामगिरीच्या अज्ञानाचा किंबहुना दोषैकदृष्टीचा अंश अधिक आहे, असें म्हणावें लागतें. टिळकांचा संबंध आलेल्या कित्येक संस्था आजपर्यंत खालावल्या असतील, कित्येक मोडल्याही असतील, पण त्या केवळ त्यांचा संबंध होता म्हणून नाहींतशा झाल्या असें ह्मणणें म्हणजे, स्वदेशी

चळवळीचें वेळीं बंगाल्यांत दुष्काळ पडला म्हणून तो स्वदेशी चळवळीनें पडला किंवा लो. टिळक विलायतेला पोंहोंचले म्हणून महायुद्ध थांबले, असें म्हणण्यासारखेच अप्रयोजक व हास्यास्पद आहे! वास्तविक कोणतीही सार्वजनिक संस्था जशी एकाच्या मतानें उभारत नाहीं, उन्नतीस येत नाहीं, तशीच ती एकाच्याच मतानें मोडत नाहीं, कीं अधोगतीस मिळत नाहीं. त्याला दुसरी अनेक बलवत्तर कारणें असतात.

कॉंग्रेसचे पुढारी किंवा कॉंग्रेस यावर जेव्हां १९०६ सालीं टिळकांनीं टीका केली व प्रत्यक्ष १९०७ सालीं कॉंग्रेसचें काम बंद पडलें, तेव्हांही विरुद्धपक्षाच्या वर्तमानपत्रांनीं वरच्याप्रमाणेंच काहूर करून या संस्थेचाही टिळकांनीं विध्वंस केला अशी त्यांच्यावर टीका केली. पण या पक्षाला असें कळेना कीं, कॉंग्रेसचा विध्वंस करून टिळकांना काय मिळणार होतें? कावीळ झालेल्या मनुष्याला सर्व जग पिंवळें दिसतें; हिरवा चष्मा चढविलेल्या मनुष्याला सगळीकडे हिरवेगार दिसतें; तद्वत् उत्कर्षासहिष्णुतेनें अंध झाल्यामुळें म्हणा किंवा अन्य कांहीं कारणामुळें म्हणा त्यांची टीका किंवा टिळकांच्या आचरणाचें तीव्र तेज त्यांना सहन न होऊन त्यांनीं वरील प्रकारचे विचार ध्वनित केले असावे. बाकी Thorean यांनीं म्हटलेलें खरेंच आहे कीं, "fault-finder will find faults even in paradise." मुद्दाम दोष हुडकणाराला स्वर्गांत देखील दोष दाखवितां येतील. वास्तविक टिळकांची त्यावेळची टिका अथवा आचरण विघातक नव्हतें, एवढेंच नव्हे तर, बदललेल्या मनुप्रमाणें बदललेल्या परिस्थितींत लोकमताच्या जोमास पुष्टिदायक व

## विधायकच होतें.

इंग्रजी राज्यव्यवस्था व इंग्रजी शिक्षण हिंदुस्थानांत सुरू झालें त्या वेळची स्थिति, किंवा कॅांग्रेस निघाली त्या वेळची परिस्थिती व आतांची स्थिति आणि गति यांत बरेंच अंतर जर पडलें आहे तर लोकमत तयार करण्याच्या साधनांतहि फरक करणें व पडणें अवश्य नाहीं काय ? 'लहानपणचें आंगडें मोठेपणीं येत नाहीं; म्हणून मोठेपणी मोठा आंगरखा शिवला पाहिजे,' हें तत्व राजकीय सुधारणेसहि बरोबर लागू पडत असून पालटलेल्या परिस्थितीप्रमाणें राजकीय पुढारी व राष्ट्रीय संस्था यांच्या संबंधानें जोरदार, निर्भीड व स्पष्टोक्तीची टीका होणें अत्यंत इष्ट आहे. तशीच टीका टिळकांनीं केली. राजकीय अगर सामाजिक किंबहुना कोणतीहि संस्था किंवा पुढारी यांच्यावर सरळ बुद्धीनें सत्याला धरून कडक टीका झाल्याशिवाय त्यांत सुधारणा, प्रगति होणें कठीण. राजकीय अडचणी अधिकाधिक उपस्थित होऊन लोकांच्या विचार व आचार स्वातंत्र्यावर गदा येऊं पहात असतां, त्यांच्या हक्कांची पायमल्ली दिसत असतां, आणि लोकमताच्या वाढत्या प्रवाहास चलन न देतां जाणून बुजून मुद्दाम त्यांस बांध घालण्याचा यत्न होत असतां दोषाविष्करणात्मक कडक टीका करण्याचें पुढारी पत्रकर्त्यांचें कर्तव्य आहे.

लो. टिळकांच्या विधायकपणाबद्दलची ही विचारसरणी ज्यांना मान्य होत नसेल त्यांना 'इंडियन सोशल रिफार्मर'चें म्हणणें तरी कबूल करणें भाग पडेल.

[library stamp: ३०३२ दा. क्र.]

" रा. टिळकांचे विरुद्ध असा एक आक्षेप घेण्यांत येतो कीं, त्यांनीं विधायक स्वरूपाचें कोणतेंहि कार्य केलें नाहीं. परंतु खरें पाहूं गेलों असतां राष्ट्राच्या इतिहासांत विधायक व विध्वंसक कार्यें यामधील भेदरेषाच स्पष्टपणें आखणें कठीण असते. गुलामगिरीची संस्था नाहींशी करणें ही कामगिरी देखील विध्वंसक स्वरूपाचीच होती."

तसेंच लो. टिळकांच्या कामगिरीबद्दल ' सर्व्हंट ऑफ इंडिया पुणें, ' यांचें पुढील मत आहे. " मराठी वृत्तपत्रांचा धंदा प्रथम स्थापन करणें, संकटांतून पुनः पुनः वर डोकें काढणें, सरकारच्या रोषांस तोंड देणें, देश प्रीतिसाठीं तुरुंगवास पत्करणें, स्वतंत्र अशी नवीं पुस्तकें लिहिणें, एक पिढी पावेतों देशाच्या बऱ्याचश्या भागांतील राजकीय चळवळीवर आपली छाप ठेवणें, व मरतेवेळीं पाठीमागें सुसंघटित असा एक मोठा पक्ष ठेऊन जाणें, या सर्व गोष्टींच्या योगानें ते आपल्या देशबांधवांच्या प्रेमादरास निःसंशय पात्र होतात. ' न्यू टाईम्स कराची ' म्हणतो, " गोखले, फेरोजशहा मेथा आणि दादाभाई या सर्वांच्या पेक्षां लो. टिळकांची कामगिरी निःसंशय श्रेष्ठ आहे. त्यांचा निसर्गतःच डेमोक्रॅटिक तत्वाकडे कल होता परंतु त्यांनीं लोकछंदानुवर्तित्व कधींहि केलें नाहीं तर उलट लोकमताला आपल्या मताकडे खेंचून आणलें. मोझेसनें ज्याप्रमाणें आपल्या लोकांस 'वचनदत्त भूमी 'च्या टप्प्यांत आणलें त्याप्रमाणें टिळकांनीं हिंदी लोकांस ' स्वराज्य भूमीच्या ' जवळपास आणून सोडलें. " " त्यांनीं बिंदुचा सिंधु केला " असें श्री. बाबू अरविंद घोष लिहितात " आणि ओबडधोबड सामुग्रींतून स्वराज्याची भव्य इमारत उभारली. त्यांनीं

हिंदी लोकांना नवीन, जोमदार, स्वावलंबी राष्ट्रीय वळण लाविलें आणि त्यांच्या राजकीय आकांक्षा जागृत करून व त्यांच्यापुढें राष्ट्रीय ध्येय ठेवून त्यांच्या मनांत स्वराज्यप्राप्त्यर्थ चळवळ करण्याच्या निश्चयाचें बीजारोपण केलें."

देशाकरितां लो. टिळकांनीं काय करावयाचें शिल्लक ठेवलें होतें याचें फार मार्मिक वर्णन 'संदेश' नें केलें आहे, "महाराष्ट्राकरितां लोकमान्य तुमच्यावर संकटें तरी किती आलीं? ह्या देशासाठीं तुम्ही चार वेळां तुरुंगांत तर गेला! आणि त्यांशिवाय तुम्ही इतर अनंत प्रकारचे जे क्लेश भोगलेले आहेत त्यांना सीमाच नाहीं. ह्या देशाच्या सेवेकरितां तुम्ही आपल्या भाग्याचीं कोठारें लुटून दिलेलीं आहेत, आपली संपत्ति पुनर्वसूच्या पावसाप्रमाणें धो धो ओतलेली आहे, ह्या देशाकरितां आपल्या बुद्धीचीं कपाटें तुम्ही सताड उघडीं ठेवलेलीं आहेत, ह्या देशाकरितां तुमचा मेंदू झिजलेला आहे ! ह्या देशाकरितां तुम्ही आपल्या प्राणांचा होम केलेला आहे. तुम्ही या देशाला काय दिलेलें नाहीं? त्याचेकरितां आपल्यावर काय ओढून घेतलेलें नाहीं ? अहर्निश देशाची चिंता करणारें मन, अहर्निश देशाच्या गोष्टी बोलणारी जिव्हा, आणि अहर्निश या थोर गोष्टी पहाणारे महाराष्ट्रांतील डोंगर, नद्या, अरण्यें हीं सर्व तुमच्या अनुपम देशभक्तीचे अतुल देशसेवेचे, असामान्य स्वार्थत्यागाचे, अमोल उद्योग व्यापृतपणाचे साक्षीदार आहेत. .......या निधड्या छातीच्या पुरुषानें या महाराष्ट्राचें जीवन आपल्या जीवनांत इतकें रंगवून, इतकें गुंगवून इतकें तन्मय करून टाकलें होतें कीं चाळीस वर्षेपर्यंत टिळक म्हणजेच महाराष्ट्र आणि महाराष्ट्र म्हणजेच टिळक होते."

## लोकमान्यांचा स्वर्गीय संदेश

टांकीचे घाव सोसल्याखेरीज देवपण कसें येणार? आज धीर धरला पाहिजे दमानें, नेटानें, नेकीनें, शांतपणें व सतत अखंड उद्योग केला पाहिजे. उद्योगापुढें व धैर्यापुढें अडचणी टिकत नाहींत. भारत मातेचें ऋण आपल्या सर्वांच्या शिरावर आहे. तिचें भोक्तृत्व मोठें आहे. पण त्या भोक्तृत्वाचें, त्या कठिण, खडतर संचिताचें आपल्या पुण्यसंचयानें, एकनिष्ठ सेवेनें, एकांतिक भक्तिनें, अभंग निश्चयानें, क्षालन करून, तिचें दिव्य सौभाग्य उज्वल करणें तिच्या पुत्रांच्या हातांत आहे. हें कालावधीचें काम आहे. आज त्याचा भरत आलेला पाया आणखी भरावयाचा आहे. विलक्षण राबावयाचें आहे. तें आपल्या पुण्यशाली पूर्वजाकरितां, आपल्या मायदेशाकरितां—भारत मातेकरितां, आपल्या लाडक्या संतानाकरितां, आपण तें काम नित्य करीत असावें. एरवी आपण आपलें कर्तव्यकर्म केल्याचें समाधान होणार तरी कसें? काळ अनंत आहे. भाग्य मोठें आहे, आणि आम्हां भारतियांच्या हातून जगाच्या घडामोडींत व मनुष्य जातीच्या विकासांत महत्त्वाचा—फार महत्त्वाचा—कार्यभाग व्हावयाचा आहे; तो होणार. तो उचलावयाची तयारी करण्यासाठीं निरपेक्ष उल्हासानें, हिमतीनें व धैर्यानें, नेटानें आणि जोमानें देशसेवेचें व्रत धरा. मागिलाचे मार्ग शोधून काढून पाऊल पुढें टाका! लो. बाळ गंगाधर टिळकांच्या विधायक कार्यक्रमापासून कोणता बोध घ्यावयाचा असेल तर तो हाच, सेवा, सेवा, देशाची सेवा करा. हाच लोकमान्यांचा स्वर्गीय संदेश आहे. ऐका.

समाप्त

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 3032
मुंबई शाखा

REFBK-0003032